# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक -५०
## सभावृत्तांत

दिनांक :- २०.०८.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगष्ट-२०१० ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.८.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
३. मा.जाधव विजया अशोक (मामी)
४. मा.थोरात एकनाथ दादा
५. मा.दत्तात्रय बाबुराव साने
६. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
७. मा.लोखंडे सुजाता सुनिल
८. मा.बो-हाडे शरद परशुराम
९. मा.आल्हाट शांता महेंद्र
१०. मा.डॉ. सौ. मीना पाटील
११. मा.खेडकर घनशाम रामचंद्र
१२. मा.कुंभार रामदास तानाजी

१३. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१४. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१५. मा.गवळी विजया पंडित

१६. मा.अजित दामोदर गव्हाणे

१७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१८. मा.महेश किसन लांडगे

१९. मा.फुगे सुनंदाताई विजय

२०. मा.आशा अंकुश लांडगे

२१. मा.मोहिनी विलास लांडे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.सावळे सिमा

२५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२७. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

३२. मा.कदम निर्मला सदगुरु

३३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३४. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३५. मा.काळूराम मारुती पवार

३६. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३७. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३८. मा.भापकर मारुती साहेबराव

३९. मा.शेट्टी जगदिश

४०. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

४१. मा.बोबडे भिमा सखाराम

४२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४३. मा.गवळी शशीकिरण

४४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४५. मा.उबाळे वैशाली संजय

४६. मा.सुमनताई मधुकर पवळे

४७. मा.कुमार आर. एस.

४८. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४९. मा.उल्हास शेट्टी

५०. मा.जावेद शेख

५१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५२. मा.कुटे गोपाळ नाना

५३. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५४. मा.भोंडवे तुकाराम महादू

५५. मा.खानोलकर मनोज विक्रम

५६. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५८. मा.वाघ रघुनाथ दलपत

५९. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

६०. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

६१. मा.आण्णा दादू बनसोडे

६२. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६३. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६४. मा.अपर्णा निलेश डोके

६५. मा.साबळे  जगन्नाथ दगडू

६६. मा.रामआधार धारिया

६७. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६८. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७०. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

७१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

७२. मा.भाऊ  उर्फ  कैलास गबाजी थोपटे

७३. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७४. मा.भारती ज्योती सुखलाल

७५. मा.कोकणे संतोष अंकुश

७६. मा.सुतार विजया विजय

७७. मा.दरेकर सतीश दगडू

७८. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७९. मा.बारणे संतोष नागु

८०. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

८१. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

८२. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग
८३. मा.खोमणे लता हनुमंत
८४. मा.प्रशांत शितोळे
८५. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर
८६. मा.अशोकभाई सोनवणे
८७. मा.सौ. गारवे सावित्री किशोर
८८. मा.साळुंखे सुरेखा मारुती
८९. मा.सौ. जगताप कल्पना कैलास
९०. मा.जगताप शंकर पांडुरंग
९१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९२. मा.एकनाथ मोटे
९३. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद
९४. मा.गायकवाड सुरदास तुकाराम
९५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९६. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
९७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९८. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे
९९. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे
१००. मा. विनायक सुरेश रणसुभे
१०१. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

याशिवाय मा.आशीष शर्मा-आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.चव्हाण- सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.भोसले - प्र.मुख्यलेखापाल, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

भंडारा डोंगर देहू येथे महापालिके मार्फत वृक्षारोपण करणेकामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा. आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८६ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, हिंदकेसरी-मारूती माने, बांधकाम क्षेत्रातील अध्वर्यू-बी.जी.शिर्के, जेष्ठ क्रांतीकारी महाकवी-नारायण सुर्वे, जेष्ठ पत्रकार, स्वातंत्र्य सेनानी व कर्मचारी पत्रकार आंदोलन नेते- गोपाळराव पटवर्धन, जेष्ठ पत्रकार- श्रीकृष्ण कुलकर्णी, जेष्ठ पत्रकार-एल्.एन्.गोखले, केरळ राज्यातील मनोरमा मल्याला चे जेष्ठ पत्रकार- के.एम्.मॅथ्यू, माजी खासदार-उषाताई चौधरी, दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे विश्वस्त आणि संस्थापक उपाध्यक्ष-मामासाहेब रासने, कलावैभव नाट्यसंस्थेचे सर्वेसर्वा ज्येष्ठ नाट्यनिर्माते-मोहन तोंडवळकर, मनपातील सहाय्यक आयुक्त श्री. पी.एच्.झुरे यांच्या मातोश्री-धोंडूबाई हनुमंत झुरे, थेरगाव-रघुनाथ हरीभाऊ गालींदे, भाग्यवती काणेकर, नंदु गं. काऴभोर, विष्णुपंत काशिद, सुनिल उर्फ आबा साटम, बाळासाहेब मिसाळ, सुष्मा पाटील, कमल भगवान पाटील, बाळासाहेब मारूती भालेकर यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी व सभा तहकुब करणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

**मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दि. २०.०८.२०१० रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.**

**(बहल योगेश मंगलसेन)**
**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी-४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ५०
सभावृत्तांत
(दि.२०.०८.२०१० (दु.२.००) ची तहकूब सभा)

दिनांक :- २०.०८.२०१०  वेळ :- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. २०.०८.२०१० (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.०८.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१ मा.बहल योगेश मंगलसेन  महापौर
२. मा.जाधव विजया अशोक (मामी)
३. मा.थोरात एकनाथ दादा
४. मा.दत्तात्रय बाबुराव साने
५. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
६. मा.लोखंडे सुजाता सुनिल
७. मा.बो-हाडे शरद परशुराम
८. मा.आल्हाट शांता महेंद्र
९. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१०. मा.खेडकर घनशाम रामचंद्र
११. मा.कुंभार रामदास तानाजी

१२. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१३. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१४. मा.गवळी विजया पंडित

१५. मा.अजित दामोदर गव्हाणे

१६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१७. मा.महेश किसन लांडगे

१८. मा.फुगे सुनंदाताई विजय

१९. मा.आशा अंकुश लांडगे

२०. मा.मोहिनी विलास लांडे

२१. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२२. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२३. मा.सावळे सिमा

२४. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२७. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२८. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२९. मा.यशवंत भोसले

३०. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.काळूराम मारुती पवार

३५. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३६. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३७. मा.भापकर मारुती साहेबराव

३८. मा.शेट्टी जगदिश

३९. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

४०. मा.बोबडे भिमा सखाराम

४१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४२. मा.गवळी शशीकिरण

४३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४४. मा.उबाळे वैशाली संजय

४५. मा.सुमनताई मधुकर पवळे

४६. मा.कुमार आर. एस.

४७. मा.उल्हास शेट्टी

४८. मा.जावेद शेख

४९. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५०. मा.कुटे गोपाळ नाना

५१. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५२. मा.भोंडवे तुकाराम महादू

५३. मा.खानोलकर मनोज विक्रम

५४. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५५. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५६. मा.वाघ रघुनाथ दलपत

५७. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५८. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५९. मा.आण्णा दादू बनसोडे

६०. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६१. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६२. मा.साबळे जगन्नाथ दगडू

६३. मा.रामआधार धारिया

६४. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६५. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६७. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६८. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६९. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

७०. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७१. मा.भारती ज्योती सुखलाल

७२. मा.कोकणे संतोष अंकुश

७३. मा.सुतार विजया विजय

७४. मा.दरेकर सतीश दगडू

७५. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७६. मा.बारणे संतोष नागु

७७. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७८. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

७९. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

८०. मा.प्रशांत शितोळे

८१. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८२. मा.अशोकभाई सोनवणे

८३. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८४. मा.साळुंखे सुरेखा मारुती

८५. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८६. मा.जगताप शंकर पांडुरंग

८७. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८८. मा.एकनाथ मोटे

८९. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

९०. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

९१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९२. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९४. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९५. मा. विनायक सुरेश रणसुभे

९६. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

याशिवाय मा.आशीष शर्मा-आयुक्त, मा.देशमुख, मा.सावंत, मा.गायकवाड, मा.मुंढे,मा.कारचे-सहा.आयुक्त मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा. पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.पाटील-प्र.सह शहर अभियंता,मा.काची - उपशहर अभियंता,मा.दुधेकर, मा.कुदळे, मा.निकम-कार्यकारी अभियंता, मा.साळुंके-मुख्य

उद्यान अधिक्षक,मा.भोसले - प्र.मुख्यलेखापाल, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.पोमण-संगणक अधिकारी व मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्र-४९ दि.२०/७/२०१० व २३/७/२०१० चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विश्वविक्रमी कामगीरी करणा-या तेजस्विनी सावंत यांचे महापालिकेतर्फे अभिनंदन करावे. पुणे महापालिकेत त्यांना आर्थिक मदत देवून शुभेच्छा दिल्या त्याप्रमाणे आपण सुध्दा आर्थिक मदत देवून शुभेच्छा द्याव्यात.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- तेजस्वीनी सावंत यांनी आपल्या देशाची मान उंचावलेली आहे आपल्या सर्वाना त्याबद्यल गौरव आहे सभागृहाच्या वतीने,पिंपरी चिंचवडच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो व भावी काळासाठी शुभेच्छा देतो त्यांचा सन्मान महापालिके तर्फे २ लाख देवून करण्यासाठी शासनाची योग्य ती मंजूरी घेण्याकरीता त्याप्रमाणे ठराव करुन तो पाठवुयात.

मा.नगरसचिव :- प्रश्नोत्तरे - मा.आप्पा ऊर्फ श्रीरंग चंदु बारणे यांना विचारावयाचे प्रश्न

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, मी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याची उत्तरे आलेली नाहीत.

मा.नगरसचिव :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त यांनी कळविलेले आहे की, ऑगष्ट-२०१० च्या मा.महापालिका सभेत मा.आप्पा ऊर्फ श्रीरंग चंदु बारणे यांनी विचारलेले प्रश्न प्रशासनास १३ ऑगष्ट-२०१० रोजी प्राप्त झालेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे तयार करणेकरिता पुरेसा कालावधी न मिळाल्याने उत्तरे तयार नाहीत. सदरच्या प्रश्नांची उत्तरे तयार करण्यासाठी किमान दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, दोन महिन्याचा कालावधी लागेल एवढे मोठे प्रश्न विचारलेले नाहीत. महापालिकेकडे अशा प्रश्नाची उत्तरे उपलब्ध असतात. किती टिडीआर दिला, कोणाला दिला आणि बांधकाम व्यावसायिकांनी जे बांधकाम केलेले आहे त्यांनी पुर्णत्वाचा दाखला कोणी कोणी घेतलेला नाही. याचे उत्तर प्रशासनाकडे पाहिजे. हा प्रशासनाचा नाकर्तेपणा आहे. त्यासंदर्भात प्रशासनाकडे लेखी स्वरुपाची माहिती उपलब्ध असावी. सभाशास्त्राच्या नियमाप्रमाणे एकदा विचारलेला प्रश्न ती सभा तहकूब झाली नाहीतर पुन्हा पुढच्या सभेला येणार नाही असे आहे तरी याचा खुलासा पाहिजे.प्रशासनाला कालावधी देण्यामध्ये मी विचार

करतो परंतु मी विचारलेले प्रश्न कोणत्या महिन्यामध्ये आपण घ्याल यासंदर्भात खुलासा केलातर निश्चितपणे माझी आणि सभागृहाची शहनिशा होईल.

मा.महापौर :- आता जो मुद्या उपस्थित केलेला आहे तो नियमाला धरुन आहे. सभा तहकूब झालीतर प्रश्न रहातो. आयुक्तांनी सांगीतल्याप्रमाणे २० नोव्हेंबरच्या सभेमध्ये प्रश्नाची उत्तरे देण्यात येतील. त्याप्रमाणे मी तुमच्याकडून प्रश्न मागवून घेईल आणि दाखल करीन.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, आप्पानी त्यांचे प्रश्न दाखल केले होते त्याचे उत्तर आलेले नाही. शहरामध्ये आरोग्याचा प्रश्न सध्या खुप मोठया प्रमाणात गाजतो आहे.

मा.महापौर :- कार्यपत्रिकेवर जो विषय आहे त्यावर बोलावे.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, औचित्याचा मुद्या आहे महत्वाचा विषय आहे.

मा.महापौर :- आपल्याकडे सभाशास्त्राचे नियम आहेत त्याप्रमाणे कामकाज चालावे अशी भावना आहे. पंधरा मिनिटाचा वेळ देण्यात येत आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, विनायक रणसूभे यांनी जो मुद्या उपस्थित केलेला आहे त्याला अनुमोदन देतो. ज्येष्ठ सभासद आप्पा बारणे यांनी बीपीएमसी ॲक्ट कलम ४४ अन्वये प्रश्न विचारलेले होते परंतु प्रशासनाने त्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागेल अशाप्रकारची भूमिका घेतलेली आहे. महापालिकेच्या बीपीएमसी ॲक्ट कलम ४४ अन्वये मागच्या तीन महिन्यापासून लोकांच्या संबंधीत विषयावर मी प्रश्न विचारतो आहे त्यासंदर्भात पिठासिन अधिकारी म्हणून आपण आमचे प्रश्न घेतले पाहिजेत. आम्ही २९.३.१० रोजी प्रश्न विचारले, ७.७.१० रोजी प्रश्न विचारले, त्यानंतर २७.७.१० रोजी कलम ४४ प्रमाणे प्रश्न विचारले परंतु महापालिका सभेमध्ये आमच्या सन्मा.सदस्यांचे प्रश्न नाकारता. हा आपल्याकडून सन्मा.सदस्यांचा,आमचा अवमान आहे असे समजतो. आम्हांला अधिकार आहे कलम ४४ अन्वये प्रशासनाला प्रश्न विचारण्याचा. सभागृहामध्ये आपण नवीन प्रथा पाडता. सर्व सन्मा.सदस्यांना आपण सारखा न्याय द्यावा. कुठल्याहीप्रकारची पक्षपाती भूमिका घेणार नाहीत असे महापौर होताना व्यक्त केलेले होते परंतु सलग तीन-चार महिने आमचे प्रश्न नाकारता आहात सदस्यांना कलम ४४ अन्वये प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे प्रश्न नाकारले असतीलतर का नाकारले याचे सविस्तर उत्तर देण्याचे बंधन आपल्यावर आहे. केवळ दोन ओळीचे पत्र आपण देता. आपण १०५ नगरसेवकांचे प्रतिनिधी आहात. शहरातील नागरीकांचे प्रतिनिधी आहात. प्रशासन उत्तर देण्यास जबाबदार आहे प्रश्न नाकारता व प्रशासनाला पाठिशी घालण्याचे काम आपण करता, यापुढे असे होवू नये. आमचा अवमान केला त्याबद्यल निषेध करतो आणि बोलण्यास संधी दिली त्याबद्यल धन्यवाद देतो.

मा.महापौर :- सदर प्रश्नाविषयी आपल्याशी चर्चा केलेली होती. तुम्ही जे पाच-सहा प्रश्न विचारले आहेत त्यापैकी चार-पाच प्रश्नाचा ऊहापोह मागच्या मिटिंगला झालेला आहे. मी विनंती केलेली होती ज्या दोन-चार प्रश्नाची चर्चा झालेली आहे तेवढे कमी करुन नवीन प्रश्न द्या परंतु तुम्ही तसे केलेले नाही. बीपीएमसी ॲक्ट प्रमाणे नाकारण्याचा अधिकार आहे त्याप्रमाणे नाकारलेले आहेत. तुम्ही पुढच्यावेळेस द्या मी घेईल.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, हे प्रश्न घेतलेले आहेत ते विषयपत्रीके बरोबर आलेले नव्हते. टिडीआर, बांधकाम परवानगी हे कॉम्प्युटरमध्ये फिड केलेले नाही का. केले असतेतर एका मिनिटात प्रश्नाचे उत्तर मिळाले असते. सर्वप्रकरणे कॉम्प्युटरमध्ये फिड केलेली नाहीत. हे प्रश्न विधानसभेमध्ये विचारले असतेतर आयुक्त साहेबांनी असे उत्तर दिले असते का, तीन महिन्यानंतर उत्तर देतो म्हणून. हे उत्तर याठिकाणी देता त्याठिकाणी देवू शकत नाहीत. त्याठिकाणी सात दिवसात उत्तर देवू शकता या ठिकाणी का देवू शकत नाहीत. दोन्ही डिपार्टमेंटने हे कॉम्प्युटरमध्ये फिड केलेले आहे का नाही हे सांगावे. फिड असेलतर उत्तर का देवू शकत नाहीत. यामध्ये असे काय आहे की तुम्ही तीन महिन्यानंतर उत्तर देणार आहात. कॉम्प्युटरमध्ये फिड केले असतेतर एक दिवसात काढले असते. फिड केलेले नसेलतर करोडो रुपये कॉम्प्युटरवर खर्च करतो त्याचा काय उपयोग आहे. तीन महिन्यानंतर काहीही घडू शकते. कॉम्प्युटरमध्ये फिड केले का नाही हे सांगावे, नाही केलेतर का केलेले नाही. बांधकाम प्रकरणे आणि टिडीआर हे कॉम्प्युटरमध्ये का फिड केलेले नाही उत्तर हो किंवा नाही असे सांगावे.

मा.महापौर :- ज्यांनी प्रश्न विचारले त्यांनी ॲक्सेप्ट केलेले आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, एकदा विषय आल्यानंतर त्या विषयावर कोणीही चर्चा करु शकतो.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, टिडीआरची माहिती फिड केलेली आहे परंतु युटिलायझेशनचा भाग आहे तो टंकलेखन करण्याचे काम चालू आहे.

मा.आर.एस.कुमार :-मा.महापौर साहेब, चौदा वर्षे झाली तुम्ही कॉम्प्युटररायझेशन करु शकला नाहीत, निषेध करुन सभा तहकूब करावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, आपण करोडो रुपये खर्च करुन अधिकारी बसविलेले आहेत, कॉम्प्युटर घेतलेले आहेत. आर.एस.कुमार यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याला अनुमोदन देतो मिटिंग तहकूब करावी.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, आर.एस.कुमार यांनी व्यवस्थीत मुद्दा मांडलेला आहे. महापालिकेनी पंधरा ते वीस कोटी कॉम्प्युटरवर खर्च केलेले आहेत. टिडीआरची माहिती नसलीतरी प्रश्न नं. ३ ची तरी माहिती द्यायला पाहिजे होती ती

दिलेली नाही, म्हणून निषेध करतो. आता बिल्डींग परमिशन मध्ये कॉम्प्युटराईज केलेले आहे त्यामुळे प्रॉब्लेम क्रिएट झालेले आहेत, प्रॉब्लेम सुटले नाहीत. बिल्डींग परमिशनचे रेकॉर्ड मागवा त्याठिकाणी मॅन्युअली काम चांगले होत होते. प्रश्न नं. ३ वर बिल्डींग परमिशनने माहिती दिली नाही म्हणून मिटिंग तहकूब करावी. बिल्डींग परमिशन विभागाने उत्तर द्यावे. मॅन्युअली आठ दिवसात काम होते आणि कॉम्प्युटरमुळे जास्त दिवस लागतात त्यामुळे अजून अडचणीत आलेले आहेत. कॉम्प्युटर डिपार्टमेंटचा निषेध करुन मिटिंग तहकूब करावी जोपर्यंत प्रश्न नं.३ चा खुलासा होत नाही तोपर्यंत मिटिंग तहकूब करावी.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, आज माहिती आणि तंत्रज्ञान दिवस आहे. आपल्या माहिती आणि तंत्रज्ञानाचे बारा वाजलेले दिसतात. आजच आपण ही माहिती देवू शकलो नाहीत हे दुर्दैव आहे. यामध्ये जे प्रश्न विचारलेले आहेत त्याची उत्तरे माहितीच्या अधिकारा खाली ऑलरेडी सीमा सावळे यांच्याकडे आहेत व काही प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत. उत्तरे माहितीच्या अधिकाराखाली दिलेली असताना याठिकाणी का दिलेली नाहीत. सन्मा.सभागृहाला उत्तर मिळू शकत नाही, माहितीच्या अधिकाराखाली मिळू शकते त्यामुळे संशयाची भूमिका वाटते. दोन-तीन महिन्याचा कालावधी फार आहे. विषयावर आता चर्चा झाली पाहिजे आणि जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी द्यायला पाहिजे.

मा.महापौर :- आप्पा बारणे यांनी जो प्रश्न विचारला त्याबद्यल आर.एस.कुमार यांनी लक्ष वेधले. सुलभाताईनी सांगीतले आज माहिती आणि तंत्रज्ञान दिवस असताना,स्व.राजीव गांधी यांची जयंती साजरी केली असताना आपले सर्व डिपार्टमेंट अपडेट केले पाहिजेत. प्रत्येक डिपार्टमेंटची माहिती संकलीत व्हायला पाहिजे. आता सांगीतले युटिलायझेशनचा तक्ता नाही तरी बिल्डींग परमिशन किंवा नगररचना विभागाने ही सर्व कामे अपडेट करावीत. ज्यावेळेला माहिती मागीतली जाईल त्यावेळेला अशाप्रकारची नामुष्की प्रशासनावर येवू नये तशाप्रकारची काळजी घ्यावी असे आदेश देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, विषय महत्वाचा आहे. या विषयावर सभा तहकूब करावी असे सांगीतलेले आहे आणि त्याला अनुमोदन मिळालेले आहे.

मा.महापौर :- वास्तविक पाहता विनायक रणसुभे यांनी सुरवात केली होती. रणसुभे यांना १५ मिनिटाची परवानगी दिली होती. तुम्ही परत उलट जाऊ नका. तुम्ही दिलेल्या सुचनांचे प्रशासनाला आदेश दिलेले आहेत.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, ज्येष्ठ सभासदांनी विषय मांडलेला आहे त्याप्रमाणे खरोखरच प्रशासनाने १५ वर्षात कुठलेही संगणकीकरण केलेले नाही त्यासाठी किती खर्च झाला याचा हिशोब नाही. या विषयापेक्षाही महत्वाचा विषय

आरोग्याचा आहे. आज स्वाईन फ्ल्यू,आरोग्याच्या विषयावर चर्चा झाली पाहिजे, ही चर्चा होवू द्यावी. सभा तहकूब करुन चर्चा होणार नाही. आरोग्य विभागाचा प्रश्न आहे. सभा तहकूब करुन त्याचे उत्तर कसे काय मिळणार. रणसुभे यांनी संागीतल्याप्रमाणे विषय चांगला आहे. हा विषय लक्षात घेवून ही सभा तहकूब होवू नये. या विषयावर ज्येष्ठ सभासदांनी सुध्दा चर्चा करावी.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आपण मला विनंती केली प्रश्नाचे उत्तर प्रशासनाकडून तयार नाही म्हणून तुमच्या शब्दाचा मान ठेवला. आर.एस.कुमार यांच्या मताशी सहमत आहे. प्रशासन प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देवू शकले नाही हा त्यांचा नाकर्तेपणा आहे, प्रशासन कशा पध्दतीने काम करते हे दिसून आलेले आहे. एखादया विषयावर सदस्यांनी मागणी केली व त्या मागणीला अनुमोदन मिळालेतर त्यावर मतदान घ्यावे लागते जर ही सभा तहकूब करायची नसेलतर आर.एस.कुमार यांच्या मताशी सहमत आहे, मतदान घ्यावे. कोटयावधी रुपयाचा आपण संगणकावर खर्च करतो, एवढा खर्च करुन सुध्दा माहिती अपडेट होऊ शकत नाही हा प्रशासनाचा नाकर्तेपणा आहे त्याचा निषेध करतो.

मा.राजेंद्र साळुंके :- मा.महापौर साहेब, तहकूबी सूचना ब-याचशा आलेल्या आहेत. शंकर जगताप,विनायक रणसुभे यांनी जी सूचना मांडली ती आरोग्याच्या प्रश्नाबाबत महत्वाची असल्यामुळे त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आरोग्याचा आहे. कुठल्याही हॉस्पिटलमध्ये पेशंटला जागा नसल्यामुळे आरोग्याचा प्रश्न गहन झालेला आहे तरी त्या विषयावर चर्चा करावी. स्थायी समितीमध्ये आरोग्याच्या प्रश्नावर सभा तहकूब केलेली होती, तरी सुध्दा परिस्थिती सुधारलेली नाही. आरोग्याचा प्रश्न गहन आहे तरी त्यावर चर्चा करावी आणि निर्णय घ्यावा.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, प्रश्न कोणी द्यावेत हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. आम्ही ज्यावेळेला प्रशासनाकडून उत्तर मागतो त्यावेळेला प्रशासनाने उत्तर द्यावे,तुम्ही देवू नये. तुम्ही आमच्यामधील आहात. सभासदांच्या प्रश्नाला प्रशासनाने उत्तर देण्याचे काम करावे, आरोग्याचा प्रश्न महत्वाचा आहे. स्वाईन फ्ल्यू संदर्भात विशेष सभा ताबडतोब बोलवावी, आर.एस.कुमार यांच्या भूमिकेशी सहमत आहे. त्याठिकाणी महापौर साहेब आपण बसलेला आहात त्यामुळे प्रशासन मनमुराद आनंद घेते आहे. संगणकीकरण झालेले आहे तरी दोन महिने माहिती घेण्यासाठी लागतात त्यामुळे या गोष्टीचा निषेध करतो.

मा.अशोक सोनवणे :- मा.महापौर साहेब, आप्पा बारणे यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत तेच प्रश्न माहितीच्या अधिकारामध्ये विचारलेतर तीस दिवसामध्ये उत्तर देणे बंधनकारक असते आणि याठिकाणी प्रश्न विचारलेतर त्याला तीन महिन्याची मुदत मागीतलेली आहे ते चुकिचे वाटते. माहितीच्या अधिकारामध्ये तीस दिवसात उत्तर

मिळते आणि प्रशासन याठिकाणी उत्तर का देवू शकत नाही. आज तंत्रज्ञान दिवस असताना असे झालेतर पुढे उत्तर देवू शकणार नाहीत. आर.एस.कुमार यांनी सुचना दिलेली आहे त्यास अनुमोदन मिळालेले होते त्याचा खुलासा नगरसचिवांनी करावा अशी मागणी करतो, त्यावर मतदान घ्यावे लागेल का नाही यावर खुलासा करावा.
(मा.नगरसचिव यांनी सभाकामकाज नियम क्रमांक २८ चे वाचन केले)
मा.भिमा बोबडे :- मा.महापौर साहेब, बैलगाडीतून चाललो आहोत असे वाटते. बैलगाडीनंतर रेसघोडा आलेला आहे. तीस दिवसात माहितीच्या अधिकारात प्रश्नाचे उत्तर मिळते आणि आपले प्रशासन तीन महिन्यानंतर उत्तर देवू असे कॉम्प्युटर असून सांगते. जे कोणी अधिकारी आहेत त्यांना सस्पेन्ड करावे आणि ही सभा तहकूब करावी नाहीतर यावर मतदान घ्यावे.
मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, एक तास झाला सभा सुरु होवून, एक तासामध्ये अनेक मुद्यांवर चर्चा चालली आहे. प्रशासनाला खुलासा करण्यास संधी द्यायला पाहिजे. सध्याचे महापौर अनुभवी आहेत, तुमच्याकडून खुप अपेक्षा होत्या की आमच्या सारख्या नगरसेवकांची बाजू उचलून धरावी पण या पध्दतीने नवीन नगरसेवकांना काही शिकण्यासाठी मिळत नाही, अनेकवेळा भांडणे होतात. मागील तीन महिन्यापासून बघतो आयुक्त साहेबांची ॲटेन्डन्स घेतलीतर सभागृहामध्ये नसतात. सहा.आयुक्तांबरोबर सभागृह चालवतो. तुम्हांला कुठेतरी आमची बाजू मांडण्यासाठी संधी मिळते, आयुक्त साहेबांनी या मुद्यावर बोलले पाहिजे. या मुद्यांवर बोलण्यासाठी संबंधीत अधिका-यांना सुध्दा संधी द्यावी. सगळी उत्तरे तुम्ही देत असालतर गैरसमज निर्माण होतो. तुम्ही त्यांची बाजु का घेता आमचे छोटे छोटे प्रॉब्लेम आहेत त्याचा खुलासा आयुक्त साहेबांनी द्यावा.
मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, आरोग्याची समस्या पिंपरी चिंचवड शहरात चालू आहे या संदर्भात चर्चा करावी आणि ज्यांना बोलायचे आहे त्यांना बोलू द्यावे. गेले साडेतीन वर्षे मी बघतो टिडीआर,लॅण्ड संदर्भात चर्चा होते परंतु आरोग्याच्या विषयावर चर्चा होत नाही. आरोग्याच्या विषयावर ज्यांना जेवढे बोलायचे आहे तेवढे बोलू द्यावे. विरोधकाना सुध्दा टिडीआरच्या विषया शिवाय दुसरा विषय नसतो. वॉर्डाच्या समस्येबाबत कोणीही बोलत नाही. आरोग्याच्या संदर्भात प्रश्न महत्वाचे आहेत. आरोग्यामध्ये गाडया नाहीत, फॉगिंग नाही. विधवा महिलांकडून १० रुपयाचे कलेक्शन घ्यायचे चालले आहे. ज्यावेळेला फॉर्म भरण्यासाठी जातात त्यावेळेला दहा-दहा रुपये घेतले जातात. फाईल पण द्या असे सांगतात. सायकल वाटप झालेले आहे ते खालच्या क्वॉलीटीच्या सायकलचे वाटप झालेले आहे, त्यापेक्षा सायकल देवू नका.
मा.महापौर :- आपण एकाच वेळेस चार-पाच विषय घेता, विषयाचे गांभीर्य धरुन बोलावे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, गायकवाड साहेबांनातर बोलता येत नाही ते म्हणतात मला माहित नाही. उल्हास जगताप म्हणतात त्यांच्याशी बोलावे. स्वाईन फ्ल्यूच्या पेशंटसाठी आम्ही त्यादिवशी वायसीएमएच मध्ये गेलो त्याठिकाणी व्हेन्टीलेटर नाही. पंधरा ठिकाणी फोन केल्यानंतर सुध्दा कुठेही उपलब्ध नव्हता.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, तुम्ही महापौर शहराच्या नागरीकांचे आहात का प्रशासनाचे आहात. ज्यावेळेपासून आपण महापौर झाला त्यावेळेपासून प्रशासनाची बाजू घेता. तुम्ही एकदा खुलासा करावा की मी प्रशासनाचा महापौर आहे,जनतेचा नाही. अधिका-यांना प्रश्न केले की तुम्ही उत्तर देता. तीन वेळा नगरसेवक सभागृहात सभेला येत नसेलतर तुम्ही त्यांना नोटिस देता. आज आरोग्याचा किती मोठा प्रश्न आहे. राजीव गांधी यांची आज जयंती आहे. कॉम्प्युटरवर करोडो रुपये खर्च करतो, १५० लॅपटॉप अधिका-यांसाठी घेणार आहोत. नगररचना किंवा बांधकाम परवानगी असो जे अधिकारी आहेत त्यांच्या फाईल पत्रावळया आहेत. आपण श्रीरंग बारणे यांच्या प्रश्नाचे उत्तर देवू शकत नाहीत परंतु याच अधिका-यांना बिल्डरने फोन केला की लगेच माहिती मिळते, संध्याकाळी कुठे भेटू म्हणतात परंतु जनतेसाठी श्रीरंग बारणे यांनी प्रश्न विचारलेतर त्यासाठी तीन महिने लागतात. महापौर साहेब तुम्ही अधिका-यांच्या नादी लागू नका तुम्ही प्रशासनाला शिस्त लावावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, अनेक चांगले वाईट विषय आलेले आहेत त्याला महापालिकेच्या अधिका-यांनी नगरसेवकांनी तोंड दिलेले आहे. विनायक रणसुभे यांनी मांडलेला विषय गंभीर आहे, इतर सदस्यांच्या भावना तीव्र आहेत व जनतेच्या कळवळीच्या आहेत. जे प्रश्न आहेत ते सोडविणे तुमचे आमचे कर्तव्य आहे. आपले काम लोकांच्या अडचणी दुर करणे आहे त्यामुळे लोकांच्या अडचणीना प्राधान्य दिले पाहिजे. आज ही सभा लोकांच्या प्रश्नासाठी द्या. आज दहा वाजेपर्यंत सभा चालू द्या. बजेटची मिटिंग सुध्दा चार-पाच तास चालत नाही. लोकांच्या प्रश्नासाठी दहा वाजलेतरी चालतील. आरोग्याच्या बाबतीत भरपूर तक्रारी आहेत. सभा तहकूब करुन प्रश्न सुटणार नाहीत. ही मिटिंग चालू ठेवून कामाचे काय आदेश द्यायचे ते द्यावेत. आज विषयपत्रिकेवरील विषय सुध्दा घ्या आणि काम सुध्दा मार्गी लावा.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, आप्पानी जे प्रश्न विचारलेले आहेत त्यासाठी ९० दिवसाचा कालावधी न घेता प्रश्नाचे उत्तर पुढच्या जीबी मध्ये द्यावे. आरोग्याचा प्रश्न महत्वपुर्ण आहे. याठिकाणी सर्व सभागृहाचे मनपुर्वक अभिनंदन करतो. संत तुकारामनगरचा माझ्या वॉर्डातील पीएमपीएमएलचा डेपो हलविण्यासाठी सर्व सभागृहाने गेली साडेतीन वर्षे प्रयत्न केले. संततुकारामनगरच्या रहिवाशांच्या आरोग्याला घातक असलेला अनाधिकृत डेपो हलविण्यासाठी संपुर्ण सभागृहाने

प्रत्येक पक्षाचे नेते,गटनेते या सर्वांनी माझ्या परिसरातील नागरीकांच्या भावनेचा आदर राखून साथ दिली त्याबद्दल नागरीकांच्या वतीने सर्व सन्मा.सदस्यांचे नेत्यांचे मनपुर्वक आभार मानतो. महापौर साहेब आपण निर्णय दिला जोपर्यंत डेपो हलवित नाहीत तोपर्यंत एक पै दिली जाणार नाही. त्याचप्रमाणे पालकमंत्री मा.अजीतदादा पवार यांनी २५ तारखेपर्यंत डेपो हलविला जाणार याबद्दल आम्हांला ग्वाही दिली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

मा.राजेंद्र साळूंके :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- जीबी मध्ये आपण खुप वेगवेगळे प्रश्न घेत आहोत. विषयाला अनुसरुन बोललेतर बरे होईल. मी सुरवातीला विनायक रणसुभे यांना सांगीतले होते की पंधरा मिनीटे देणेत येतील. मी प्रशासनाच्या बाजूने बोललो नाही आणि उत्तरही दिलेले नाही. मी असे सांगीतले की आपण विषयाला धरुन बोलावे. आपल्याला जीबी कशी चालवायची हे आपण ठरवायचे असते महापौरांनी नसते. दिड तास झाला आपण या विषयावर ऊहापोह करतो आहोत. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. प्रश्नाच्या उत्तरासाठी एवढा वेळ का लागतो आहे. संगणकावर कोटयावधी रुपये खर्च झालेला असताना एवढा अवधी का लागतो आहे. यापुढे प्रशासनाकडून अशाप्रकारचे उत्तर अपेक्षीत नाही आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, आम्ही जो वेळ मागीतला होता यामध्ये प्रश्न नं.३ वर चर्चा झालेली आहे, कॉम्प्युटराईज झाले, उत्तर का देत नाहीत. यामध्ये वाढीव बांधकाम किती केले असा प्रश्न आहे ते कुठल्याही कॉम्प्युटरमध्ये होणार नाही, किती लोकांनी बांधकाम वाढविले हे प्रत्यक्ष साईटला गेल्यानंतरच समजणार आहे. ती यादी जनरेट करावी लागते. प्रश्न क्र.३ ची माहिती संगणकावर मिळणार नाही, साईटवर गेल्याशिवाय ती देवू शकणार नाहीत त्यासाठी जास्तीत जास्त दोन महिन्याचा पिरीअड लागेल त्या अगोदर झालेतर ते देवू शकतो.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब,आज माहिती आणि तंत्रज्ञानाचा दिवस आहे. वाढीव बांधकाम झालेले जागेवर गेल्याशिवाय समजणार नाही. बांधकाम परवानगी देत असताना काही क्षेत्रफळ असेल त्याची नोंद निश्चितपणे होत असते ज्यावेळेस करसंकलन करतो त्यावेळेला वाढीव क्षेत्रावर टॅक्स आकारला जातो, त्याची सांगड घातलीतर माहिती सांगता येईल. त्याठिकाणी संगणकाचा वापर करुन सांगड घालून माहिती मिळेल. आरोग्य विभागावर बोलत असताना याठिकाणी आर्थिक व्यवहाराचे विषय जास्त असतात. महापालिकेचे नागरीकांच्या मुलभूत सुविधेकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. आरोग्य विषयावर वर्तमानपत्रातून रोज वाचतो. रोगराई वाढलेली आहे, एवढे होवूनही अजूनपर्यंत त्यावर उच्चाटन केलेले दिसत नाही. आरोग्य विषया संदर्भात मी पत्र दिलेले होते परंतु आरोग्य अधिका-यांचे याठिकाणी दुर्लक्ष दिसून

येते. डॉ.नागकुमार यांना विचारावे मी बैठकीचे पत्र दिलेले होते. ती बैठक न बोलविण्याचे काय कारण आहे. महापौर साहेब आपल्याला सुध्दा पत्र दिलेले आहे.
मा.महापौर :- विरोधीपक्षनेते राजेंद्र काटे यांनी पत्र दिलेले आहे त्याच्या अनुषंगाने ही सभा स्थायी समिती हॉलमध्ये उदया ठेवली आहे त्याबद्यल डॉ.नागकुमार यांना कल्पना दिलेली आहे.
मा.डॉ.कुणचगी :- मा.महापौर साहेब, यासंदर्भात मा.महापौर यांचे पत्र होते. उदया दुपारी १.०० वा. स्थायी समिती सभागृहात बैठक आयोजित केलेली आहे.
मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, स्थायी समिती हॉलमध्ये बैठक ठेवण्यापेक्षा याचठिकाणी सभा आयोजीत करावी आणि आरोग्याचे सर्व अधिकारी याठिकाणी बोलावून घ्यावेत. प्रभाग मिटिंगमध्ये या गोष्टी आम्ही मांडलेल्या आहेत. याठिकाणी जे आरोग्याचे कर्मचारी आहेत ते वाढवायचे नाहीत असे सांगण्यात येते. क्षेत्रफळ वाढलेले आहे परंतु कर्मचारी वाढलेले नाहीत. तरी या सर्व विषयावर निषेध करतो ही सभा तहकूब करावी.
मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, सर्व सदस्यांच्या मनात असे आले की आपण प्रशासनाची बाजू घेता त्यांना बोलू देत नाहीत या मताशी २५ टक्के सहमत आहे. आपण नगरसेवक आहात प्रशासनाची सर्व बाजू माहित असल्यामुळे आपण बोलत असता. आयुक्त साहेबांनी सांगीतले आहे प्रश्न क्रमांक ३ चे उत्तर आता देवू शकत नाही. २००९ ला शासनाने जीआर काढलेला होता, तो आपल्याकडे आलेला होता. अनाधिकृत बांधकामाबाबत आपणही बीट निरीक्षक नेमलेले आहेत ते काय काम करतात. अनाधिकृत बांधकामाची नोंद आपण करत नाहीत. मी क-प्रभागामधुन माहिती घेतलेली आहे. दिघी,मोशी,च-होली याठिकाणी अनाधिकृत बांधकाम मोठया प्रमाणात झालेले आहे. याठिकाणी बीट निरीक्षक कशासाठी नेमले आहेत. जे बांधकाम व्यावसायीक आहेत ते अनाधिकृत बांधकाम करतात त्याची नोंद व्हायला पाहिजे होती. आपण सांगीतले आता उत्तर देवू शकत नाही, आपलेच अधिकारी फसवत आहेत. डीपीचा प्रश्न आहे विकास कामास किती टिडीआर दिला, आपली महापालिका रजिष्टर मेन्टेन करते त्याची झेरॉक्स कॉपी दिलीतर टिडीआर किती वाटला हे लगेच लक्षात येईल त्यांनी छोटे-छोटे प्रश्न विचारले होते, यामध्ये प्रशासनाला कुठल्याही प्रकारचा त्रास होईल असे वाटत नाही. हेतूपुरस्सर माहिती प्रशासन दडवते असा माझा आरोप आहे. बांधकाम विभाग बिल्डर लोकांच्या अनाधिकृत बांधकामामध्ये प्रशमन शुल्क आकारते ते कुठल्या विशिष्ठ बांधकामासाठी आहे असा विषय झालेला नाही. नियमाचा भंग करुन बांधकाम परवानगी विभाग प्रशमन शुल्क आकारत आहे. माहिती देवू शकले असते परंतु ती टाळली आहे. आयुक्त साहेब आपण व्यवस्थीत माहिती घेतली असतीतर ही माहिती मिळण्यासाठी दोन दिवसाचा कालावधी खुप आहे, ही माहिती माझ्याकडे आहे. विरोधी पक्षाला

टिडीआर,एफएसआय,अनाधिकृत बांधकाम दिसतात असे बोलले. आपण आरोग्याच्या प्रश्नावर बोलतो हा प्रश्न याच्यापुढे किती जटील होणार याची कल्पना आहे म्हणूनच मी बोलते.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, आरोग्य खात्याची स्थिती गंभीर आहे. डॉ.नागकुमार यांचे थोडे दिवस राहिलेले आहेत. त्यांना मी सांगीतले होते तुम्ही तुमच्या खालच्या अधिका-यांना ताईट करा. डेंग्यू, मलेरीया, स्वाईन फ्ल्यू, चिकूनगुण्या असे अनेक प्रकारचे आजार आहेत. डॉ.नागकुमार तुम्ही खुलासा केला पाहिजे. तुमच्या कडे लोक कमी आहेत का, जे लोक आहेत ते काम करत नाहीत का. दहा महिन्यात एवढा आजार कसा काय पसरलेला आहे. आमच्या वॉर्डात एकिकडे आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेले नागरीक आहेत व दुसरीकडे व्यापारी वर्ग आहे. आयुक्त साहेब आपण आरोग्याच्या बाबतीत सिरीअस व्हावे, आरोग्य विभागाची वाईट अवस्था आहे. महापौर साहेब, आपण उदया मिटिंग ठेवलेली आहे हे बरोबर झाले. सगळया वॉर्डात स्वच्छता पाहिजे कचरा नसावा. बंड साहेब असताना परंपरा होती, कुठल्याही समिती मिटिंग मध्ये अधिका-यांचा विषय असो किंवा नसो प्रत्येक अधिकारी उपस्थित राहत होते. त्यांचे विषय नसलेतरी ते उपस्थित असल्यामुळे सदस्यांचे समाधान होत होते. आता अधिकारी उपस्थित राहत नाहीत. यावर कुठला आदेश निघालेला आहे का. जिजामाता हॉस्पिटलच्या बाबतीत परवा आपल्याशी चर्चा झालेली आहे. मी मागच्या वेळेस मागणी केलेली होती महापालिकेनी स्वत:च्या खर्चाने त्याठिकाणी चांगल्या पध्दतीचे हॉस्पिटल बांधावे. काळेवाडी, राहटणी, पिंपरीगांव, पिंपरी कँप या भागातील जे सर्वसामान्य,मध्यमवर्गीय आणि त्या खालचा जो समाज आहे त्यांच्यासाठी त्या हॉस्पिटलचा फायदा होणार होता. आपण बीओटीवर कसे टेंडर काढले हे आम्हांला माहित नाही. परवा मोर्चा सुध्दा आलेला होता. एखाद्या वॉर्डाचा विषय असेलतर त्या नगरसेवकाची उपस्थिती आवश्यक असते का हे सांगावे, खुलासा करावा. सिटि सेंटरमध्ये पैसे मिळणार आहेत. आज ना उदया तो विषय करावाच लागेल. आयुक्त साहेब त्यातून दहा कोटी काढून हॉस्पिटलसाठी खर्च करावेत. मला अभ्यास करुन बोलावे लागेल, चार पिढी मागे किंवा चार पिढी पुढेतरी जावे लागेल. आपलेच दात आणि आपलेच ओठ. हे हॉस्पिटल ताबडतोब महापालिकेनी बांधावे आयुक्त साहेब आपण घोषणा करावी की महापालिकेच्या खर्चाने हॉस्पिटल बांधु.

मा.महापौर :- तो महापालिकेचा दवाखाना आहे, परिसरामध्ये तसे दवाखाने नाहीत, तेथील परिस्थिती लक्षात घेता गोरगरीब त्याठिकाणी उपचार घेतात. बीओटीवर टेंडर काढलेले असलेतरी बीओटीचे टेंडर रद्य करावे असे आयुक्तांना आदेश देतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, तीन वाजल्यापासून सभा सुरु झालेली आहे. सर्व जाणकार नगरसेवक आहेत. आरोग्याचा प्रश्न रणसुभे यांनी मांडला

त्यांच्याशी सहमत आहे. दरवेळेला सिजन बदल होतो आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो त्यासाठी विभाग आहे. संगणकीकरणामध्ये चौदा-चौदा वर्षाची नोंद नाही. आपण मागे गेलेलो आहोत असे वाटते. साथीचे रोग सुरु होतात, पावसाळा सुरु
होतो, नालेसफाई पुर्वी झाली आहे का. हा रेग्युलर प्रश्न आहे प्रशासनाने व्यवस्थीत हाताळायला पाहिजे जेणेकरुन साथीच्या रोगावर कंट्रोल आला पाहिजे. स्वाईन फ्ल्यूने मरणा-यांची संख्या जास्त आहे. मी आयुक्त साहेबांना फोन लावला, डॉ.नागकुमार यांना फोन लावला, शहरामध्ये खरोखरच व्हेंटीलेटरची व्यवस्था पिंपरी चिंचवडच्या हॉस्पिटलमध्ये कुठेच नाही. त्याठिकाणी वरचा मजला आहे त्यामध्ये आयसीयू केलातर चांगले होईल त्यासाठी सभासदांनी मंजूरी द्यावी. तशी मान्यता पाहिजे असेलतर ती द्यावी. वायसीएममध्ये फोन केलातर सांगीतले पैसे संपल्यानंतर पेशंट आमच्याकडे येतात. आयसीयूमध्ये पेशंट येतात ते पेशंट आपण घ्यायला पाहिजेत. असा कायदा नाही की दुसरीकडचे पेशंट आपल्याकडे घ्यायचे नाहीत, हे कशासाठी. आयुक्त साहेब आपला कंट्रोल सुटलेला आहे असे वाटते. तुमचा कंट्रोल अधिका-यांवर मुळीच नाही. स्वाईन फ्ल्यूच्या पेशंटनी दुसरीकडे एक्स-रे काढलेला असेलतर तो पेशंट आयसीयू मध्ये घ्यायला पाहिजे. ९० टक्क्यापर्यंत पोहचलेले पेशंट असतीलतर त्यांची लागण दुस-याला लागल्याशिवाय राहणार नाही. २६ जुलैचा पुर आलेला होता त्याअगोदर मिटिंग झाली पाहिजे. सिटी सेंटर बद्यल आमच्या सारखे सांगतात असा प्रोजेक्ट योग्य असेलतर तो राबविला पाहिजे, स्वाईन फ्ल्यू सारखी लस फ्रि मध्ये दिली पाहिजे. ती १३० रुपयाला लोकांना मिळते. आपण जसे पोलीओ साठी राबवितो तशी ही लस स्वाईन फ्ल्यूची द्यायला पाहिजे. रामकृष्ण मोरे यांची आठवण येते वायसीएम हॉस्पिटल ज्यावेळेला बांधले तेव्हा पांढरा हत्ती असे म्हणत होते आणि आज त्याठिकाणी लोकांची लाईन लागते. तेथील कर्मचारी सुध्दा त्यांच्या परीने काम करत असतात ती सुध्दा माणसे आहेत डॉक्टरांवर लोड बघता आपण पुर नियंत्रण कक्ष उघडतो तसा तेथेही कक्ष उघडला पाहिजे. महापौर साहेब, आपण सिनीअर आहात, तुम्हांला सर्व गोष्टीची जाण आहे. उलटसुलट चर्चा चालू आहे. पावणेदोन तास झाले चर्चा चालली आहे विषयाला सुरवात करावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, शहरात एक महिन्यापासून पेपरमध्ये येते आहे. प्रत्येक दवाखान्यामध्ये स्वाईन फ्ल्यू, मलेरिया, डेंग्यू, फ्ल्यू अशा वेगवेगळया आजाराने पिंपरी चिंचवडकर ग्रासलेले आहेत. पावसाळयापुर्वी संपुर्ण नाले तुंबलेले असतात ते साफ केले पाहिजेत असा फतवा प्रशासन काढत असते. नाले साफसफाई करतो परंतु ज्याठिकाणी पाणी साचण्याची शक्यता आहे त्याठिकाणी डास होतात त्या ठिकाणचा नायनाट करण्याची जबाबदारी आरोग्य विभागाची आहे. त्यासाठी फॉगिंगची यंत्रणा आपल्याकडे आहे. मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिका-यांनी उत्तर द्यावे

स्प्रेकुली आणि फॉगिंगसाठी विशिष्ठ कि.मी. अंतराला एवढे एवढे कर्मचारी असावेत असे शासनाचे परिपत्रक आहे का.

मा.महापौर :- आताच मंगलाताईनी सुचना केलेली आहे उदया यावर मिटिंग ठेवलेली आहे आता बोलल्या नंतर उदयाच्या मिटिंगमध्ये आपण काय बोलणार.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, या महापालिकेमध्ये अंधळ दळत आणि कुत्र पिठ खात असे आहे. तीन विभागामध्ये आरोग्य विभाग चालतो. १९८५ ला स्प्रेकुली भरलेले आहेत त्यांची शैक्षणिक अर्हता दहावी पास असते. ते १०५ वॉर्डात १०५ द्यायला पाहिजे होते. ५५ लोक भरले तेव्हा मजूर,गटरकुली यांना सरसकट खांदयावर ओझे दिले होते. आधुनिक प्रकारच्या स्वंयचलीत मशीन्स आल्या होत्या, सिटीगार्ड भाडयाने घेतलेले होते. सिटीगार्ड महापालिकेनी का खरेदी केले नाहीत. दहा-दहा लीटरचे ओझे पाठीवर घेवून कामगारांनी कसे जायचे. प्रत्येक विभागाने औषधाची डिमांड दिलेली आहे त्याचा पुरवठा देखील झालेला आहे. हे औषध एप्रिलमध्ये घ्यायला पाहिजे होते ते आता ऑगष्ट महिन्यामध्ये आलेले आहे. कुठल्याहीप्रकारे सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी निगडीत काम करण्याची जबाबदारी तुम्ही घेत नाही. याठिकाणी कोणीही कोणाचे ऐकत नाही. सर्वसामान्यांनी कुठे जायचे, नगरसेवकांनी कोणाला न्याय मागायचा. म्हणून हा औचित्याचा मुद्या मांडण्याची वेळ आलेली आहे, सदस्यांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. खुलासा करावा.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सर्वांनी आरोग्याच्या विषयावर बोलावे. आमच्या भागातील वाढती लोकसंख्या पाहता एका वॉर्डात आपण औषध फवारणीसाठी किती लोक दिलेले आहेत. एका माणसाने किती ऐरिया कव्हर करायचा आहे. आमच्या येथील घंटागाडी बंद केलेली आहे त्याचे कारण काय. ते उदयाच्या सभेमध्ये सांगीतलेतर बरे होईल. लोकांची संख्या कमी केलेली आहे ती का कमी केलेली आहे. आमच्या वॉर्डाची लोकसंख्या ३० हजार आहे आणि कामगार १५ आहेत ४ गटरकुली आहेत. आठवडयातून किती कचरा साफ करायचा. शहरामध्ये कॉम्पॅक्टरची किती संख्या आहे. आपण पाठिमागे रिक्षा घेतल्या आहेत त्या किती चालू आहेत किती बंद आहेत व त्या कुठल्या वॉर्डामध्ये सोडलेल्या आहेत गाडया विभागवार कशा देणार आहेत आणि कशा चालविणार आहेत याची माहिती द्यावी.

मा.महापौर :- दत्तात्रय साने आपले प्रश्न आरोग्य विभागाचे आहेत. आयुक्तांना उदया अर्जंट मुंबईला बोलावले असल्यामुळे उदयाची मिटिंग सोमवारी दुपारी ४.०० वाजता घेऊ. तेथे लेखी उत्तर डॉ.नागकुमार यांनी द्यावे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, मी जाहिर निषेध करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, खरेतर अशाप्रकारची बैठक घेण्याची वेळ सुध्दा आपल्यावर यायला नाही पाहिजे. मुळामध्ये प्राथमिक आरोग्य आपले कर्तव्य आहे त्यापासून आपण दुर जातो. गेल्यावर्षाची मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्ल्यूची संख्या पाहिलीतर आपण सुधारणा करायला पाहिजे होती. मलेरियाचे ६१६, डेंग्युचे ६७९ आणि स्वाईन फ्ल्यूचे १२७० रुग्ण आहेत यामध्ये ५९ रुग्ण मृत्युमुखी पडलेले आहेत. एवढया मोठया प्रमाणात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर,सदस्यांनी सांगीतल्यानंतर तुम्हांला जाग येते. तुम्ही तुमच्या कर्तव्यापासून दुर जाता व नंतर सभागृहाचा वेळ घेता. सत्तारुढ पक्ष म्हणून तुमचाही प्रशासनावर अंकुश नाही. या शहरात रुग्णांचा सुळसुळाट झालेला आहे, रुग्ण वाढलेले आहेत, आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभागृहाचा वेळ कचरा उचलण्यासाठी घेतला जातो
याला जबाबदार आपण आहोत. कचरा उचलला जात नाही, विल्हेवाट लावली जात नाही. ७२ कोटी अ,ब,क,ड चे ६३ कोटी कचरा उचलण्यासाठी खर्च करतो. एवढया मोठया प्रमाणावर खर्च होत असेलतर आणि परत विषयावर चर्चा करुन केवळ ही चर्चा झाली यातून मार्ग निघत नाही. महापालिकेचे कर्तव्य आहे या शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगल्याप्रकारे ठेवणे, कच-याची विल्हेवाट लावणे, या उद्देशापासून आपण बाजूला गेलेलो आहोत. या शहरातील प्रशासन ठरावीक अर्थव्यवस्थेमध्ये गुंतलेले आहे म्हणून ही ससेहोलपट होते आहे. रुग्णालयामध्ये पेशंटला भरती करण्यासाठी जागा सुध्दा उपलब्ध नाही. खाजगी डॉक्टर आणि खाजगी हॉस्पिटलमधून शहरातील नागरीकांची मोठया प्रमाणात लुट होते याबाबतीत महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने दक्ष राहिले पाहिजे.
मा.महापौर :- आरोग्याच्या बाबतीत विशेष सभा २३.८.२०१० रोजी दुपारी ४.०० वा.स्थायी समिती सभागृहात घेण्यात येणार आहे. विषयाला सुरवात करावी.
मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.लेखा/३/कावि/१४२/२०१० दि.१२/५/२०१०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११२२७ दि.८.०६.२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९३९ दि.२३.७.२०१० अन्वये.

महाराष्ट्र शासन निर्णयान्वये पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. या दोन्ही संस्था एकत्र होऊन पी.एम.पी.एम.एल. या नावाने नवीन संस्था स्थापन झाली असुन शासन

निर्णयानुसार मागील तीन वित्तीय वर्षात पीएमटी व पी.सी.एम.टी. दोन्ही महापालिकांनी खर्च भागविणे साठी जे अनुदान दिले असेल त्याची सरासरी काढून सरासरी एवढे अनुदान संबंधीत महापालिका कंपनीकडे वर्ग करेल असे कळविले नुसार या मनपाने रक्कम अदा केलेली असून सदर तीन वर्षे कालावधीची मुदत दि.३१ मार्च, २०१० रोजी पुर्ण झाली असल्याने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मुदत पुर्ण झाल्याने परिवहन विभागास उचल या लेखाशिर्षावर कोणतीही तरतूद केलेली नसून तसे पी.एम.पी.एम.एल. यांना कळविण्यात देखील आलेले असताना पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी एप्रिल २०१० चे वेतन अदा करणेसाठी र.रू.१ कोटी २७ लाख मिळणेकामी विनंती केली असल्याने वरील बाबी विचारात घेता पी.एम.पी.एम.एल. यांना रक्कम अदायगीबाबत निर्णय घेणेत यावा असा प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे त्याकामी पुर्व पिसीएमटीच्या कर्मचा-यांच्या संख्येप्रमाणे किंवा पिसीएमटीचे पीएमपीएमएल या कंपनी मधील शेअरप्रमाणे (हिश्याप्रमाणे) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-९७१ विषय क्रमांक :- १

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.लेखा/३/कावि/ १४२/२०१० दि.१२/५/२०१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११२२७ दि.८.०६.२०१०

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९३९ दि.२३.७.२०१० अन्वये.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.प्रेमकुमार नायर, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दि.१६/६/२०१० ठराव क्र.४७
३) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.११३७५ दि.२९.६.२०१०
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.९४० दि.२३.७.२०१० अन्वये.

म.न.पा. परिसरातील म.न.पा. व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रात विकास होण्याच्या दृष्टीने व कार्यालयीन कामाच्या सोईच्या दृष्टीने क्रीडा विभागांतर्गत आस्थापनेवर असणारे सर्व क्रीडा शिक्षकांवर शिक्षण मंडळाचे नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने म.न.पा. क्रीडा विभागातील सर्व क्रीडा शिक्षक व क्रीडा पर्यवेक्षक आस्थापनेसह शिक्षण मंडळाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- त्यामधील श्री राजू कोतवाल क्रीडा पर्यवेक्षक (क्रिकेट) यांची सरळसेवेने नेमणुक क्रीडा पर्यवेक्षक (क्रिकेट) या पदावर झाली असल्याने त्याना वगळून मान्यता देणेत यावी व श्री कोतवाल यांना स्टेडीअम व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात यावी. पिंपरी चिंचवड मनपाच्या क्रिडा विभागातील श्री दिगंबर प्रभाकर वाघेरे यांना क्रिडा पर्यवेक्षक वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य विभागातील सेवाजेष्ठ पदविकाधारक उपअभियंता श्री लियाकत कासम पीरजादे यांना रिक्त झालेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. महापालिकेचे वाढीव कार्यक्षेत्र, रुग्णांची वाढती संख्या तसेच कामकाजाची आवश्यकता विचारात घेता महापालिका आस्थापनेवर “चिफ फार्मासिस्ट” या अभिनावाचे एक नवीन पद रक्कम रुपये ९३००-३४८०० ग्रेड पे-५४०० या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करुन शासन मान्यता घेण्यास व सदर पद १२ वी सायन्स ऊत्तीर्ण असणा-या व फार्मासिस्ट पदावर नेमणूक असलेल्या संवर्गातील सेवाजेष्ठ व फार्मासिस्ट पदाचा २० ते २५ वर्षाचा अनुभव असणारे कर्मचारी श्री.मंगेश राघोबा जगताप, फार्मासिस्ट या कर्मचा-यास पदोन्नती देऊन भरण्यास मान्यता देणेत यावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, विद्यार्थ्याचा क्रिडा क्षेत्रात विकास होण्याच्या दृष्टीने व कार्यालयीन कामाच्या सोईच्या दृष्टीने आताचे जे क्रिडा शिक्षक आहेत शिक्षण मंडळाच्या नियंत्रणाखाली घेतात असा उल्लेख विषयात आहे आपल्या

शहरामध्ये टोटल १३८ शाळा आहेत त्यासाठी क्रिडा शिक्षक फक्त ३४ आहेत हे शिक्षणमंडळाच्या नियंत्रणाखाली आपण आणतो याच्यामुळे आपले प्रॉब्लेम सुटणार का. आपण प्रॉपरली डिव्हाईड केलेतर चार शाळेमध्ये एक शिक्षक, ऑलरेडी हे कमी आहे. क्रिडा शिक्षक प्राथमिक शाळेमध्ये नेमलेले आहेत. बाकीच्या खात्यामध्ये लोक व्यवस्थीत काम करत नाहीत त्यांना पनीशमेंट म्हणून इकडे पाठवितो. ३४ शिक्षक शाळेमध्ये व्यवस्थीत काम करत नाहीत, शाळेमधील कारकूनाचे काम हे शिक्षक करतात. मुलांना खरेच क्रिडाविषयक शिक्षण द्यायचे असेलतर कमीत कमी ३५ शिक्षक वाढविले पाहिजेत. स्टूडंट लोकांना शिक्षण द्यायचे असेलतर ३५ शिक्षक घेतले पाहिजेत. अजून ३५ तरी शिक्षकांना शाळेसाठी नेमले पाहिजे.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, महापालिकेच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक कमी पडतात. त्यांची सुचना आहे मानधनावर शिक्षक घ्यावेत परंतु माझ्या माहितीप्रमाणे मागच्या काळामध्ये असे शिक्षक घेण्याची विनंती प्रशासनाकडे केलेली होती, त्यांनी सांगीतले आपल्याकडे पदे मंजुर नाहीत त्यामुळे अशाप्रकारे शिक्षक घेता येणार नाहीत. माझी विनंती आहे की शाळेमध्ये ख-या अर्थाने विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्याच्या दृष्टिने याठिकाणी मंजुर पद नसलेतरी आयुक्त साहेब यासंदर्भात विचार करुन या सर्व शाळेमध्ये चांगल्याप्रकारे शिक्षक नेमत असताना ते खेळाडू असावेत, नॅशनल लेव्हलला, राज्यपातळीवर खेळलेले असतीलतर ते चांगल्याप्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना देतील.

मा.अलकाताई यादव :- मा.महापौर साहेब, सगळया शाळेमध्ये जो शिक्षक वर्ग आहे तो खुप कमी आहे. एका वर्गामध्ये ११४ मुले आहेत. प्रत्येक शाळेकडून प्रस्ताव मागवावा आणि शिक्षक घेण्याची व्यवस्था करावी.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आपण पुर्वीच सांगीतले होते उपसूचना घेणार नाही. महापालिकेची वाट उपसूचनांमध्ये लागली आहे. ४० कोटी वाढीव हे सर्व उपसूचनामुळेच झालेले आहे त्यामुळे उपसूचना घेवू नका. आपण ऑलरेडी सांगीतले आहे की उपसूचना घेणार नाही. मा.अजीत पवार यांनी सुध्दा सांगीतले होते उपसूचनामध्ये काम करु नका.

मा.महापौर :- पुर्वी फक्त दोन ओळी वाचायचे आता सबंध उपसूचना सभागृहासमोर मांडली जाते ती पास करायची का नाही हा सभागृहाचा अधिकार आहे. संपुर्ण उपसुचना व्यवस्थीतपणे मांडू शकता सभागृहाने तो निर्णय घ्यावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, हा सदस्य प्रस्ताव आहे तो का आणला गेला याच्या मागचे कारण शोधले पाहिजे. मुळामध्ये जे शिक्षक क्रिडा विभागामध्ये आहेत त्यांना महापालिकेच्या सहा.आयुक्तांकडुन त्रास होतो का, त्यांच दुखण काय आहे, आपण क्रिडा विभाग वेगळा केलेला आहे. क्रिडा अधिकारी वेगळे केलेले आहेत त्यावर कोटयावधी रुपये खर्च करतो आणि क्रिडा शिक्षक आणि पर्यवेक्षक वेगळे

केल्यानंतर त्यांच्यावर काही परिणाम होईल का याचा खुलासा पाहिजे. या शिक्षकांच्या तक्रारी संबंधीत विभागप्रमुखाच्या बाबतीत आपल्याकडे आलेल्या होत्या का, याचा खुलासा करावा. आपण मुळ शोधत नाहीत. या शिक्षकांच्या,पर्यवेक्षकांच्या तक्रारी संबंधीत विभागाप्रमुखा विषयी आहेत त्यामुळे हा विषय शिक्षकांनी आणायला लावला आहे म्हणून आपल्याकडून खुलासा पाहिजे.

मा.महापौर :- हा विषय सदस्यांचा आहे त्यामुळे आपण मंजुरी दिली किंवा नाही तरी त्याची अंमलबजावणी करायची का नाही हे प्रशासन ठरवेल. आपल्याकडे पीटी शिक्षक वेगळे आहेत क्रिडा विभाग वेगळा केलेला आहे. आपण चांगल्याप्रकारे राष्ट्रीय खेळाडू घडविलेले आहेत, हे ३४ लोक काय काम करतात. महापौर चषक घ्यायचा त्यास शेवटच्या दिवसापर्यंत मंजुरी होत नाही. हा विषय सभागृहाचा आहे त्यामुळे सभागृहाने ठरविले पाहिजे. राजेश पिल्ले, अजीत गव्हाणे यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत त्यांच्याकडून आपल्याला रिझल्ट आवश्यक आहे वर्गीकरण करणे गरजेचे आहे का याचा खुलासा करावा.

मा.साहेबराव गायकवाड :- मा.महापौर साहेब, हा प्रस्ताव सदस्य प्रस्ताव आहे. यात दोन प्रकारचे विषय आहेत. क्रिडा शिक्षक आणि क्रिडा पर्यवेक्षक. क्रिडा पर्यवेक्षक हे क्रिडा खात्याचे काम चालते त्यासाठी आहेत आणि क्रिडा शिक्षक जे आहेत त्यांना शिक्षण विभागात वर्ग करण्यासाठी त्यांची पुर्वीपासून मागणी होती. त्यात त्यांचे म्हणणे असे होते की क्रिडा शिक्षक शाळेमध्येच काम करतात. क्रिडा पर्यवेक्षक वर्ग करता येणार नाहीत क्रिडा शिक्षक हे शाळेसाठी असतात.

मा.सुधाकर देशमुख :- मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाकडून मागणी अशी की चार ते पाच शाळांसाठीच्या क्रिडा शिक्षकांवर मुख्याध्यापकाचे नियंत्रण नसते. हे वर्ग करायचे झालेतर त्यांचे नियंत्रण द्यावे लागेल. आज रोजी ते मोकळे राहतात त्याकरिता त्यांच्यावर नियंत्रण असावे म्हणून असा प्रस्ताव सदस्यांकडून ठेवलेला आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी मागे शिक्षणमंडळात असताना सुध्दा मागणी होती. शिक्षक,पर्यवेक्षक किंवा क्रिडा अधिकारी हे शिक्षणमंडळात आहेत. महापालिकेच्या ५५ हजार विद्यार्थ्यांना क्रिडा शिक्षक नाही. जो कंट्रोल असायचा ते क्रिडा समितीमार्फत असायचा. त्याकरिता ही मागणी पाच-सहा वर्षापासून होत होती. क्रिडा शिक्षक जायचे कधी,यायचे कधी याच्यावर बिलकूल कंट्रोल नव्हता. यासाठी ही जुनी मागणी आहे. आपण चार हजार मानधनावर क्रिडा शिक्षक घेतो आणि नॅशनल लेव्हलवर मुले जावीत म्हणतो, कशी काय जातील हे कसे काय शक्य आहे. भरपूर मानधन देवून क्रिडा शिक्षक म्हणून नेमलेतर आपल्या विद्यार्थ्यांना फायदा होईल.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, हा विषय चुकिच्या पध्दतीने आलेला आहे. शिक्षणमंडळातील क्रिडा शिक्षक आहेत ते बीपीएड झालेले असतात महापालिकेच्या

क्रिडा खात्या तर्फे शहरातील शाळे व्यतिरीक्त खेळाडूंची प्रगती करुन देण्यासाठी क्रिडा शिक्षक नेमलेले आहेत. राजेश पिल्ले आणि उल्हास शेट्टी यांनी मांडलेला विषय गांभीर्याने घेण्यासारखा आहे. कुठेतरी तफावत होते अशी परिस्थिती आहे. शिक्षणमंडळ हे वेगळे आहे आणि क्रिडाखाते वेगळे आहे. त्यामुळे क्रिडा खात्यामध्ये जे शिक्षक भरलेले आहेत ते महापालिकेतील विद्यार्थ्यां व्यतिरिक्त इतर जे विद्यार्थी घ्यायचे आहेत शहराचे नावलौकीक वाढविण्याच्या दृष्टिने भरलेले शिक्षक आहेत त्यांना चार हजार आणि तीन हजार मानधनावर ठेवलेले असेलतर ती दुर्दैवाची बाब आहे. अनेक वर्षे आपण अपेक्षा करायची गोल्ड मेडल मिळावे म्हणून आणि पिंपरी चिंचवडचे नाव लौकिक करायचे असेलतर या शिक्षकांना चार हजार मानधनावर ठेवलेतर ते योग्य नाही. महापालिकेच्या शाळेतील शिक्षकांना ज्याप्रमाणे वेतन आदा केले जाते त्याप्रमाणे या क्रिडा शिक्षकांना पे अदा केला जावा व सर्व फॅसिलीटी द्याव्यात परंतु त्यांना शिक्षण मंडळाकडे वर्ग करु नये. त्यासाठी बीपीएड जे शिक्षक नेमणे आवश्यक आहेत ते घ्यावेत. या विभागाकडून आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना घडविलेले आहे आणि किती खर्च आतापर्यंत करण्यात आला याचा सुध्दा विचार करावा. तफावत असताना हा विषय मंजुर करु नये हा विषय फेटाळावा. क्रिडा खात्यात राजेश पिल्ले सारखे सक्षम व्यक्ति आलेले आहेत, क्रिडा खाते सक्षम करावे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ९७२ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.प्रेमकुमार नायर, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दि.१६/६/२०१० ठराव क्र.४७
३) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.११३७५ दि.२९.६.२०१०
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.९४० दि.२३.७.२०१० अन्वये.

म.न.पा. परिसरातील म.न.पा. व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रात विकास होण्याच्या दृष्टीने व कार्यालयीन कामाच्या सोईच्या दृष्टीने क्रीडा विभागांतर्गत आस्थापनेवर असणारे सर्व क्रीडा शिक्षकांवर शिक्षण मंडळाचे नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने म.न.पा. क्रीडा विभागातील सर्व क्रीडा शिक्षक व क्रीडा पर्यवेक्षक आस्थापनेसह शिक्षण मंडळाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत यावी अशी शिफारस करणेत आली आहे त्याप्रमाणे त्यास त्यामधील श्री राजू कोतवाल क्रीडा पर्यवेक्षक (क्रिकेट) यांची सरळसेवेने नेमणुक क्रीडा पर्यवेक्षक (क्रिकेट) या पदावर झाली असल्याने त्याना वगळून मान्यता देणेत येत आहे व श्री कोतवाल यांना स्टेडीअम व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या क्रिडा विभागातील श्री दिगंबर प्रभाकर वाघेरे यांना क्रिडा पर्यवेक्षक वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य

विभागातील सेवाजेष्ठ पदविकाधारक उपअभियंता श्री लियाकत कासम पीरजादे यांना रिक्त झालेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिकेचे वाढीव कार्यक्षेत्र, रुग्णांची वाढती संख्या तसेच कामकाजाची आवश्यकता विचारात घेता महापालिका आस्थापनेवर "चिफ फार्मासिस्ट" या अभिनावाचे एक नवीन पद रक्कम रुपये ९३००-३४८०० ग्रेड पे-५४०० या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करुन शासन मान्यता घेण्यास व सदर पद १२ वी सायन्स ऊत्तीर्ण असणा-या व फार्मासिस्ट पदावर नेमणूक असलेल्या संवर्गातील सेवाजेष्ठ व फार्मासिस्ट पदाचा २० ते २५ वर्षाचा अनुभव असणारे कर्मचारी श्री.मंगेश राघोबा जगताप, फार्मासिस्ट या कर्मचा-यास पदोन्नती देऊन भरण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ९७३ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.जयश्री गावडे,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११४१५ दि.८.७.२०१०

दिनांक १० ऑक्टोबर २०१० रोजी ॲग्रीकल्चर कॉलेज पुणे येथे तेज ग्यान फाऊंडेशन पिंपरी यांचे तर्फे विश्वशांतीसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सदर कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित रहाणार असल्याने सदर कार्यक्रमास मनपातर्फे र.रु. १०,००,०००/- (शासन मान्यतेच्या अटीवर ३० लाखाचे मर्यादे व्यतीरीक्त ) देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ९७४ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. रामदास कुंभार ,मा. प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव..
२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११४४६ दि.१३.७.२०१०

श्री प्रविण सोहनलाल पिवाल, सफाई कामगार, ड प्रभाग, श्री राजेश भरतु चरण, सफाई कामगार वाय.सी.एम.एच. या मनपा कर्मचाऱ्यांची मुले कु. मयुर प्रविण पिवाल व कु.गौरव राजेश चरण यांचे नदित बुडून दु:खद निधन झाले असल्याने त्यांस मनपा तर्फे र.रू.५०,०००/- प्रत्येकी आर्थिक सहाय्य करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.भुजि/२/कावि/१४५/२०१०दि.१६/७/२०१०
२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११४९० दि.२७.७.२०१०

से.नं.२८, संत ज्ञानेश्वर महाराज व्यापारी संकुल मधील रिक्त गाळा क्र.७ श्रीम.सविता प्रविण थोरात यांना [क्षेत्र चौ.मी. २८ + (पोटमाळा ८.२९) सह / २५ वर्षाचे मनपा दर मनपा / शासन करा व्यतिरिक्त र.रू.८,६०,४३७/- / २५ वर्षाचे बंद पाकीट दर मनपा / शासन कराव्यतिरिक्त र.रू.८,६२,०००/-] व गाळा क्र.१० श्रीम.शालिनी हंदुराव थोरात यांना [क्षेत्र चौ.मी.३५ + (पोटमाळा ८.२९) सह / २५ वर्षाचे मनपा दर मनपा / शासन कराव्यतिरिक्त र.रू.१०,४३,८३७/- / २५ वर्षाचे बंद पाकीट दर मनपा/शासन कराव्यतिरिक्त र.रू.१०,४५,०००/-] २५ वर्षाच्या लिजने निविदा अटी शर्तीनुसार देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ९७५ विषय क्रमांक :- ५

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.भुजिं/२/कावि/१४५/२०१०दि.१६/७/२०१०
२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११४९० दि.२७.७.२०१०

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि.
नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९४१ दि.२३.७.२०१० अन्वये.

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आरक्षित जागेच्या सभोवताली असलेल्या वापराचे वर्गीकरण विचारात घेऊन विकास हक्क हस्तांतरणासाठी (टि.डी.आर.)अनुज्ञेय करावयाचा चटई क्षेत्र निर्देशांक किती असावा हे प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेले असुन त्यानुसार म.प्रा.व न.रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र. N.**2.4.5** मध्ये बदल करणेसाठी/तरतुदी नव्याने समाविष्ट करणेसाठी पुढील प्रमाणे फेरबदल प्रस्तावीत करण्यात आला असुन-

“ N.**2.4.5**- The builtup area for the purpose of F.S.I. credit in the DRC shall be equal to the gross of the reserved plot to be surrendered & will proportionately increase or decrease according to the permissible FSI of the Zone where from the TDR has originated and more particularly mentioned in Table No.**31**”, त्यानुसार सदरचे नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट

करण्याच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.
मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.
मा.वैशाली घोडेकर :- मा.महापौर, महापालिकेनी रेडीरेकनर बनविला आहे का नाही, ग्रीन झोन, रेड झोन असे आहे का, खुलासा करावा.
मा.अविनाश पाटील :- मा.महापौर, शासनास विनंती केलेली होती त्या अनुषंगाने शासनाने कळविल्यानुसार हा प्रस्ताव ठेवला आहे.
मा.वैशाली घोडेकर :- मा.महापौर, शहराच्या विकासासाठी नागरिक जागा/जमीन देणार आणि तुंम्ही त्यांना ५०% च देणार, जुन्या नियमावलीप्रमाणे का देत नाहीत.
मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर, आयुक्तांनी या विषयाचा सविस्तर खुलासा करावा आपल्याकडे ९५ पासुन टीडीआर देण्याचे चालु आहे आणि आताच त्यामध्ये बदल करण्याचे का सुचले आहे यामध्ये सुचना कोणी केली आहे. शासनाने काही आदेश दिलेले आहेत का ?
मा.महापौर :- तुमच्या या विषयामुळे सर्व सभासदांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. यामध्ये बिल्डरचा,शेतक-याचा कोणाचा फायदा आहे हा विषय कोणी आणला, यामध्ये कोणाचा इंटरेस्ट जास्त आहे. वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे की इतक्या कोटीचा भ्रष्टाचार आहे. शासनाने १९९५ साली डीपी मंजुर केला आहे नियमांना मंजुरी दिलेली आहे नियम अस्तित्वात असताना त्याप्रमाणे २०१० पर्यंत कार्यवाही चालु असताना अशी कोणती अडचण आली की तुम्हांला शासनाला रेफर करावे लागले. त्याचा मुख्य हेतू काय आहे याची स्पष्टता करावी. नियमांना मंजुरी दिलेली असताना नवीन काहीतरी करावे असे तुम्हाला का सुचले याचा खुलासा करावा.
मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, रावेतच्या एका प्रकरणामध्ये रस्त्याचा टिडीआर देण्याचा प्रस्ताव आला. एका बाजुला प्राधिकरणाचा एलो झोन होता व दुस-या बाजूला नवीन गावाचा एलो झोन होता व मध्ये ३०० ते ३५० मी. ग्रीन झोन होता त्यामुळे त्या केसमध्ये शासनाला रेफर केलेले होते. त्यावर शासनाने डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंगला हा प्रस्ताव रेफर केला त्यांनी याचा विचार करुन एक टेबल तयार करुन शासनाला दिला व शासनाने सांगीतले ३७ प्रमाणे प्रस्ताव करावा.
मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, शासनाला पत्र पाठविले त्यासाठी जी.बी.ची परवानगी घेतली होती का. तुम्ही कोण डीसी रुल चेंज करणारे म्हणून शासनाला लिहिले. पॉलीसी मॅटरसाठी शासनाला लिहिता त्यासाठी जीबीची मान्यता घेतली का, सजेशन, ऑब्जेक्शन मागविले का, जोपर्यंत जीबीची मान्यता मिळत नाही तोपर्यंत जे डीसी रुल आजपर्यंत केलेले आहेत त्याची अंमलबजावणी होईल. डीसी रुल आजपर्यंत आहेत त्याप्रमाणे परवानगी दिली पाहिजे. एरिगेशन विभागाचे

नोटिफिकेशन आपल्यावर बंधनकारक नाही. शासनाचे आलेतर ते बंधनकारक आहे. सर्व मीसगाईड झालेले आहे, सजेशन,ऑब्जेक्शन पहिले घ्यावे. लोकांना माहिती होवू द्यावी सजेशन, ऑब्जेक्शन घेतल्यानंतर परत हा विषय आमच्या समोर आणावा तोपर्यंत जे डीसी रुल आहेत त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. बीआरटीला आम्ही आयुक्त साहेबांना परवानगी दिली त्याठिकाणी काय झाले माहित आहे. जे डीसी रुल मंजूर केलेले आहेत त्याप्रमाणे महापालिकेनी कार्यवाही केली पाहिजे.

मा.महापौर :- बीआरटीला आपण मान्यता दिलेली आहे, प्रशासनाने चुक केलेली आहे त्याच्यावर अंमलबजावणी होत नाही. विषयाला उपसुचना देवुन रेक्टीफिकेशन करुन शासनाला पाठवावे लागणार आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, ग्रीनमध्ये .५ द्यायचा का १ द्यायचा आहे हे शॉर्टमध्ये सांगावे आणि महापालिकेचे मत काय आहे आणि डायरेक्टरचे मत काय आहे हे सांगावे.

मा.महापौर :-  रावेत मध्ये एका विशिष्ठ केसमध्ये आवश्यकता आली आणि ते शासनाला रेफर केले परंतु आपले नियम काय म्हणतात हे सांगावे.अशा प्रकारे याच्या अगोदर किती लोकांना टीडीआर दिला हे सांगावे.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, ही पर्टिक्युलर केस होती त्यामुळे ती रेफर केली. मुंबईचे डेव्हलपमेंट प्लॅनचे वेगवेगळे झोन आहेत त्याला धरुन आपली नियमावली आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, रावेतसाठी शासनाला लिहिले, ती केस कोणाची होती.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, ३७ करा असे म्हणले जीबीपुढे त्याप्रमाणे आलेले आहे.

मा.अमर मुलचंदानी :-  मा.महापौर साहेब, महापालिकेचे डीसी रुल आहेत त्याची व्यवस्थीत अंमलबजावणी व्हावी. आपण आयुक्तांना लिहिणार परत शासनाला जाणार अशात एक वर्षे जाणार, किरकोळ कामाच्या दुरुस्तीसाठी हे आहे. जे डीसी रुल मंजुर आहेत त्याप्रमाणे महापालिकेचा कारभार चालविला पाहिजे. डायरेक्टरला तुम्ही का लिहिले आहे, ते आमच्या महापालिकेचे बॉस नाहीत. आम्ही याठिकाणी मान्यता दिली असती. डायरेक्ट टाऊन प्लॅनिंगला कशाला विचारले त्यांनी घोळ केला. तुम्ही गोंधळ कशासाठी करता. डीसी रुल आहेत त्याची अंमलबजावणी करावी. कायदा काय म्हणतो डीसी रुल प्रमाणे काम करावे. शासनाप्रमाणे,युडीप्रमाणे करावे.  कुठल्या दोन मुद्यांसाठी अमेन्डमेंट याठिकाणी आणलेली आहे.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, ज्या झोनमधुन टिडीआर जनरेट झाला त्याच्याप्रमाणे टीडीआर राहिल. मुंबईचा डेव्हलपमेंट प्लॅन बघितलातर आपल्याकडे रेसिडेन्शीअलमध्ये १ व गाठाणमध्ये २ एफएसआय असे धरलेले आहे. आपण

झोनींग केलेले नाही हा रेफरन्स जेव्हा आपण केला त्यानंतर संचालक नगररचना यांनी अभ्यास करुन शासनाला टेबल दिलेला आहे व शासनाने ३७ चा प्रस्ताव करुन शासनाला सादर करावा असे कळविले आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, रेड झोनची अंमलबजावणी करणार नाही असे मागे सांगीतले होते त्याप्रमाणे हे काम झालेले नाही. ब्ल्यू आणि रेड अजून नाही. तुम्हांला एरिगेशनचे पत्र आले उदया हेल्थ डिपार्टमेंटचे पत्र येईल हॉस्पिटल बंद करावे म्हणून, तुम्ही करणार का. एरिगेशनचे पत्र तुम्ही ग्राहय धरलेतर तुम्ही तुमची जबाबदारी टाळता. आयुक्त साहेब, आपल्या अेडीटीपी मध्ये वीस-वीस वर्षे लोकांच्या बदल्या झालेल्या नाहीत त्यामुळे लोकांची कामे होत नाहीत. वीस-वीस वर्षे अेडीटीपीमध्ये कामाला आहेत त्यांची का बदली करत नाहीत. बिल्डींग परमिशनमध्ये तसेच आहे. शासनाचा कायदा आहे तीन वर्षात बदली करावी कोणाचा इन्ट्रेस्ट आहेत त्यांची का बदली होत नाही. वीस-वीस वर्षे झाले आहेत काय इन्ट्रेस्ट आहे. टाऊन प्लॅनींग झाले तेव्हापासून आजपर्यंत कामाला लोक तेथेच आहेत म्हणून त्यांची मनमानी त्याठिकाणी चालू आहे त्यांची मोनोपॉली झालेली आहे. त्यामध्ये काय चालले आहे हे चेक करा. शासनाच्या खात्यात तीन ते पाच वर्षात बदली होते. शेतकरी लोकांच्या अडचणीमुळे आम्ही बोलतो. या विषयावर अभ्यास करावा या विषयाची दुरुस्ती काय आहे हे सांगावे. यामध्ये चौकशी केलीतर बरेचसे लोक सापडतील. हा विषय दप्तरी दाखल करावा जो डीसी रुल आहे त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.

मा.सिमाताई सावळे :- मा.महापौर साहेब, गेली सहा महिने झाले हा विषय सभागृहासमोर येतो आहे त्याच्यावर निर्णय होत नाही. पाटिल साहेबांच्या एका चुकिमुळे गेली सहा महिने हा विषय थांबलेला आहे. डीसी रुलला ओव्हरराईड करु शकतो का आणि हा विषय का आला. पुर्वी एक टिडीआर वाटप केला आहे आणि केलेले पाप झाकण्यासाठी विषय आणलेला आहे. जुन्या गावातील डीपीवर अजुन ३७ खाली निळी आणि लाल पुररेषा आखलेली नाही. त्याठिकाणी टिडीआर देणार कसा. नवीन गावाच्या संदर्भात शासनाची कार्यवाही चालू आहे परंतु जुन्या गावात नाही त्याठिकाणी टीडीआर वाटप झालेला आहे म्हणून हा विषय आणला आहे टिडीआरचा विषय एकाएकी येतो कसा. शासनाला आयुक्तांनी पत्र लिहिले आहे. एक कोटी चौ.फु. टिडीआर वाटल्यानंतर आपल्याला असे वाटले की नियमात स्पष्टता नाही. .४ एफएसआयची तरतूद असेलतर तो तेवढाच द्यायला पाहिजे. स्पष्टपणे तरतूद असल्यानंतर नगररचनेला कसे काय सुचले शासनाला विचारावे म्हणून. यामध्ये पुर्वी टिडीआर वाटला आहे केवळ ते पाप झाकण्यासाठी हा विषय आणलेला आहे. डायरेक्टरला त्यांनी टेबल दिलेला आहे त्यात बदल केलेला आहे.

निळी पुररेषा आणि लाल पुररेषा त्यामध्ये आरक्षण असल्यास त्यांनी त्याठिकाणी .५ द्यायचे सांगीतले आहे.

मा.महापौर :- शासनाने डायरेक्टरच्या पत्रा वर आयुक्तांना पत्र लिहिले आहे ते वाचावे.

(मा.अविनाश पाटिल यांनी दि. ५.१.२०१० चे पत्राचे वाचन केले)

मा.महापौर :- आपल्याला अधिकार दिलेला आहे. आपल्या आयुक्तांना पाटिल साहेबांनी चुकिची माहिती दिलेली आहे. सभागृहाचा अपमान आहे. गॅझेट झाले असते,नोटिफिकेशन झाले असतेतर ठिक आहे, पाटिल साहेबांनी आयुक्तांना चुकिचे सांगीतलेले आहे. जीबीची मान्यता आहे का असे शासनाने म्हणले आहे त्यामुळे तो अधिकार आपला आहे, तो निर्णय आपण घ्यायचा आहे. गेल्या सोळा वर्षात अशाप्रकारची डेव्हलपमेंट झाली आहे अशाप्रकारचा टिडीआर लोड झालेला आहे. एक डायरेक्टरचे पत्र आपले काम थांबवते कसे.

मा.सिमाताई सावळे :- मा.महापौर साहेब, संचालक जे आहेत ते शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम करतात. शासनाने सांगीतले दहा रुपयाची नोट आहेतर ते दहा रुपये आहेत. ते याठिकाणी काम करतात. शासनाने सांगीतल्याप्रमाणे ते काम करतात. पाटिल साहेब आणि आयुक्तांमध्ये काय कन्फ्यूजन आहे हे मला माहित नाही. अशाठिकाणी त्यांनी टिडीआर दिला का नाही हे सांगीतले पाहिजे आपण माहिती दिली पाहिजे. आपल्याला अधिकार आहेत ते करा परंतु माहिती का दिलेली नाही. आपण त्यामध्ये पहिला टिडीआर दिला आहे म्हणून हा विषय सभागृहापुढे आणण्याची गरज वाटली आहे. पहिला टिडीआर दिलेला आहे ती स्पष्टपणे कबूली द्यावी. ती कबुली दिल्यानंतर सभासदांच्या शंका-कुशंका निघु द्यात. आपण डीसी रुलला ओव्हरराईड केलेले आहे त्याला ओव्हरराईड करण्याचा अधिकार आपल्याला नाही. प्रशासनाला आपण विरोध केला पाहिजे. याठिकाणी जुन्या गावातील डीपीवर पुररेषा कोणी आखली, कशी आली, त्यात असलेले बांधकाम,टिडीआर पुररेषेच्या आतमध्ये नेण्याचा विषय आला त्यावेळेला मी याच्या मागे लागले. जुन्या गावच्या डीपीवर अधिकृतपणे मार्क केलेले नाही त्याची दखल घेवून ३७ खाली आपण करावे. शासनाने करण्यापेक्षा आपण केलेतर बरे होईल. मी आपल्याला पत्र दिलेले आहे ते माझे म्हणणे व हरकत समजुन सभावृत्तांतामध्ये समावेश करावा. शासनाने निर्देश दिलेले आहेत संचालकाप्रमाणे याठिकाणी अंमलबजावणी करणेत यावी. तसे न करता महापालिकेनी जे बदल केलेले आहेत त्याप्रमाणे केलेतर माझा त्याला विरोध राहिल असे नमुद करावे.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, मुलचंदानी यांनी सूचना मांडली आहे त्याला अनुमोदन देतो. त्यामुळे खरोखरच महापालिकेचे नुकसान होणार आहे का. पाटिल साहेबांनी सांगावे ९५ पासून २०१० पर्यंत डीपी प्लॅननुसार आपल्याकडे किती क्षेत्र

ताब्यात आले, किती आरक्षणे आणि रस्ते ताब्यात आले आणि त्यातील आपण भूसंपादनद्वारे किती आणि टिडीआरद्वारे किती घेतले. आपण ही वीस वर्षाची माहिती द्यावी. गेल्या वीस वर्षात डीपी मंजुर होवून १०० टक्के आरक्षणे आणि रस्ते ताब्यात घेवू शकत नाहीत किंवा सुधारणा करु शकत नाहीत, मग डीपी प्लॅन कशासाठी, त्याची अंमलबजावणी होत नाहीतर त्यातच दुरुस्ती करण्याचा प्रयत्न कशासाठी चाललेला आहे. वस्ती वाढलेली आहे, काळेवाडीसारखा परिसर पाहिलातर डीपी रोड डेव्हलप झालेला नाही, तो का झालेला नाही. N.२.४.५ नुसार किती क्षेत्र बाधीत होते आहे. निळी पुररेषा आणि लाल पुररेषा याच्यामध्ये किती क्षेत्र येते आहे. मी टिडीआर घेतला आणि शेजा-याना टिडीआर द्यायचातर तो .५ मिळतो तर ती जागा ताब्यात देणार का. मग एवढे कशासाठी करता. अमर मुलचंदानी यांनी सांगीतल्याप्रमाणे विषय दप्तरी दाखल करुन जुना डीसी रुल आहे त्याप्रमाणे चालू राहावे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषयाच्या अनुषंगाने मी उपसंचालक विभागाला पत्र दिलेले होते, किती टिडीआर दिलेला आहे,किती टिडीआर देणे भाग आहे याची सविस्तर माहिती विचारलेली होती. त्यांनी कुठल्याहीप्रकारचे उत्तर मला दिलेले नाही. पाटिल साहेबांना ही माहिती द्यायला दहा दिवस सुध्दा कमी पडतील. कदाचित ते देवू शकणार नाहीत मग हे कशासाठी करायचे. रावेतसारख्या गावचा प्रश्न उपस्थित केलातर आमचा तळवडे भाग रेडझोनने बाधीत असलेला त्यामध्ये टिडीआर देत नाहीत. रावेतच्या प्रश्नासाठी एवढे केले मग आमच्या रेडझोनच्या प्रश्नाबाबत आपण काय काय केलेले आहे हे सांगावे. इन्डेक्सप्रमाणे किती टिडीआर दिलेला होता आणि किती द्यायचा आहे याचा खुलासा करावा.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, आपण इतर ठिकाणी एक आणि गावठाण असेलतर दोन टिडीआर दिलेला होता. टेबलमध्ये इन्डेक्स दिला त्याला त्याप्रमाणे गुणले जाईल. अजून क्षेत्र ताब्यात यायला अवधी लागेल.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, किती अवधी लागेल.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, किमान दोन आठवडेतरी लागतील.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, दोन आठवडयांनी सर्व सदस्यांना माहिती घरी पाठविणार का.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, माहिती तयार करतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, आपला डीपी तयार आहे. टिडीआर किती दिला हे माहिती आहे त्याचे रेडीरेकनरनुसार किती भाव देणे बाकी आहे हे सुध्दा माहिती असायला पाहिजे. मी विचारतो ते कागदपत्र आहेत का नाहीत. आमच्या

भागामध्ये डीपी प्लॅनमध्ये आरक्षण टाकलेले आहे त्यांना टिडीआरचा मोबदला दिला जात नाही. रेडझोन आहे.
मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त यांच्या स्तरावर बैठक झाली. ४५ दिवसात नकाशा द्यावा त्याप्रमाणे डिफेन्सला पत्र लिहिले होते त्यावर तोडगा निघत नव्हता. परवाच विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्तांची बैठक झालेली आहे त्यामध्ये जुने नकाशे आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव दाखल करता येईल.
मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, पाटील साहेबांचे उत्तर कच्चे असते. असे उत्तर द्यावे की जे उत्तर स्पष्टपणे सोप्या भाषेत सभागृहाला समजेल. आरक्षण ताब्यात घेण्यासाठी तुम्ही काय केले हे सांगावे. आई कुठे गेलीतर बाबा गावाला गेले हे सांगणे बंद करावे. आता तुमचा गृहपाठ बंद करावा हा विषय तहकूब करावा.
मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, जुनी हद्द आणि नवीन हद्द या क्षेत्रातील आरक्षणाची अडचण आहे. आरक्षणे वेगवेगळी असतील, रस्ते असतील त्याची माहिती दिली पाहिजे. आरक्षणे किती आहेत, त्याचे क्षेत्रफळ किती आहे. आणि त्यांना टिडीआर देवू शकत नसुतर त्यांना पैसे देण्यासाठी आपल्याकडे पैसे आहेत का. महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे. आपण पैसे देवू शकत नसूतर आणि टिडीआरमध्ये खो घालत असूतर त्याचा काय उपयोग आहे. कुठल्याही नियमांचा आधार न घेता आपण मनाला वाटेल तसा कारभार करत असालतर ते आम्हांला मान्य नाही. याप्रकरणासाठी किती प्रकरणे प्रलंबीत ठेवली आहेत हे सांगावे. प्रलंबीत जे प्रश्न आहेत त्याची तरी माहिती द्यावी. जुन्या नियमावलीनुसार तुमच्याकडे जी प्रकरणे सादर झालेली आहेत त्यानुसार तुम्ही दिलेच पाहिजे. शासनाला विचारणार त्याच्या नंतर देणार. बीआरटीएसमध्ये छोटीछोटी प्रकरणे आहेत त्याच्यावर सुध्दा टिडीआर लोड करुन देत नाहीत. मागच्या वर्षी चालु झालेले काम त्याच्यावर सुध्दा टिडीआर लोड करुन देत नाहीत. याठिकाणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत शासनाला प्रश्न का पाठविता. प्रश्न चघळत बसण्यापेक्षा जो काही रेशो ठरविला त्याप्रमाणे देणार का, जुन्याप्रमाणे देणार आहात हे सांगावे. सभागृहात बांधकाम व्यावसायीक आहेत त्यामुळे सगळयांना याची जाण आहे त्यामुळे पुर्वीचा दिलेला चुकिचा आहे का हे सिध्द करावे. दिला असेलतर तो किती दिलेला आहे हे सांगावे, छोटेछोटे प्रश्न आहेत त्याचे उत्तर द्यावे काही सुचना आहेत त्या सुध्दा ऐकूण घ्याव्यात.
मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, हा विषय सभागृहामध्ये आणण्याची वेळ का आलेली आहे. या विषयामध्ये टाऊन प्लॅनिंगचे पाटिल साहेबांनी केलेला खुलासा समाधानकारक नाही. मुळामध्ये डीपी प्लॅन जो केला गेलेला आहे तो आपल्या शहरामध्ये विकास करण्याच्या दृष्टिने, चांगला नियोजनबध्द विकास व्हावा आणि येथे राहणा-या लोकांना चांगल्याप्रकारच्या सुखसोई मिळाव्यात यादृष्टिने रस्ते डीपीमध्ये

टाकलेले आहेत. महापालिकेनी भूसंपादन करुन जागा ताब्यात घ्याव्या लागत होत्या. नंतरच्या काळात टिडीआरचा कन्सेप्ट लागू झाल्यानंतर आपल्याकडेही लागु झालेला आहे. रिझर्व्हेशन ताब्यात घेत असताना अनेक अडचणी येत होत्या, भूसंपादन करुन रिझर्व्हेशन ताब्यात मिळत नव्हते. भोसरी, काळेवाडी, राहाटणी, थेरगांव ही गावे प्राधिकरणाच्या झोनमध्ये होती. या गावामध्ये टिडीआर उशिरा झाला त्यामुळे अनाधिकृत बांधकामे त्याठिकाणी झालेली आहेत. आज त्याठिकाणी डेव्हलप करता येणार नाही. टिडीआर इम्प्लीमेंट झाल्यानंतरच्या काळात अनेक डेव्हलपमेंट झालेल्या आहेत. नाटयगृह, गार्डन झालेली आहेत अशाप्रकारची कामे टिडीआर इम्प्लीमेंट झाल्यापासून व्हायला लागलेली आहेत. टिडीआर कन्सेप्ट लागू झाल्यानंतर शेतक-यांना, जमिनमालकांना चांगल्याप्रकारचा मोबदला मिळू लागलेला आहे. परंतु आता जो नियम सभागृहापुढे आणलेला आहे या नियमाप्रमाणे जमिनमालकांवर अन्याय होणार आहे. ज्यांची जागा ताब्यात घेणार त्यांना .५,.२ असा टिडीआर दिलातर कुठलेही मालक तुमच्याकडे जागा ताब्यात देण्यास येणार नाहीत आणि अनाधिकृतपणे बांधकामे होतील. त्यामुळे शहराची डेव्हलपमेंट करायची असेलतर पुर्वीचे जे नियम होते, ज्या पध्दतीने टिडीआर जमिनमालकांना द्यायला पाहिजे होता त्याप्रमाणे द्यायला पाहिजे. पुर्वी एक टिडीआर दिला जात होता.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, डीसी रुलमध्ये एकची तरतूद आहे का.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, आपण इतर ठिकाणी एक आणि गावठाणामध्ये दोन असा दिलेला आहे........

मा.महापौर :- तुम्हांला काय अपेक्षीत आहे हे आम्हाला नको, कायदयात काय आहे हे सांगावे. मुंबईचे संागू नका. डीसी रुलमध्ये एकची प्रोव्हीजन आहे.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, प्रशासनाकडून प्रॉपर खुलासा होत नसेलतर, प्रॉपर्ली या गोष्टी सदस्यांपुढे येत नसतीलतर सदस्यांमध्ये गैरसमज होतो आणि पेपरमध्ये वेगवेगळया बातम्या येतात. एक एफएसआय पुर्वी देत होतो त्याप्रमाणे एफएसआय देणेत यावा. आपल्याकडे डीपी प्लॅन जो झालेला आहे त्यामध्ये वेगवेगळयाप्रकारचे झोनींग आणि रिझर्व्हेशन टाकलेले आहेत त्याच्यामध्ये काही भागात कमर्शिअल असे प्लॉटस आहेत असे झोनींग केलेले आहे त्याठिकाणी एखादा प्लॉटधारक प्लॅन पास करण्यासाठी आलातर आपले बिल्डींग परमिशन किंवा नगररचना विभाग त्यांचा प्लॅन पास करुन देत नाही, त्यांना संागते ५० टक्के कमर्शिअल असले पाहिजे, कमर्शिअल टाकले असेलतर त्याठिकाणी माझा प्लॉट असेलतर त्यात काय रुल आहेत. त्याचा खुलासा करावा. कमर्शिअल करण्यापेक्षा त्या व्यक्तिचा रेसिडेन्शीअल करण्याचा प्रयत्न असेलतर, त्याला रेसिडेन्शीअलमध्ये स्कोप असेलतर कमर्शिअलपेक्षा लोअर येईल त्यामुळे रेसिडेन्शिअलला परवानगी

द्यायला हरकत नाही. रेसिडेन्शिअल परपजसाठी कमर्शिअल प्लॉटवर बांधकाम परवानगी मिळावी अशी मागणी केलीतर आपण नेमके काय करतो हे सांगावे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, सर्व नगरसेवक याठिकाणी बसलेले आहेत. आयुक्त साहेबांनी सांगावे सर्व अधिकारी हाऊसमध्ये पाहिजेत, मागे का बसलेले आहेत. याठिकाणी सगळया विभागाचे अधिकारी पाहिजेत. आमचे मत काय आहे हे त्यांना कसे काय समजणार. यापुढे सर्व अधिकारी जीबी मध्ये पाहिजेत. सभागृहाची विनंती आहे सर्व अधिकारी सभागृहामध्ये उपस्थित पाहिजेत. आम्ही नुसती चर्चा करु त्याला काय अर्थ आहे नाहीतर याठिकाणी आम्ही मिटिंगला थांबणार नाहीत.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, अनुमोदन आहे. कायदा दाखवु नये.

मा.महापौर :- आयुक्तांना आदेश देतो की येथून पुढच्या जीबीला सर्व अधिकारी सभागृहामध्ये हजर पाहिजेत.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, डीपी प्लॅनमध्ये काही कमर्शिअल झोन केलेले आहेत. जसे रेसिडेन्शिअल झोन आहेत तसे. सी-२ झोन म्हणतात. सी-२ मधील एखादा जागा मालक तुमच्याकडे प्लॅन मंजूर करण्यासाठी आलातर कुठल्या आधारावर देता. कमर्शिअल प्लॉटला रेसिडेन्शिअल करायचे असेलतर.

मा.काची :- मा.महापौर साहेब, सी-२ झोनमध्ये मार्च महिन्याच्या अगोदर सी-१, आर-१ अलाऊड होते. आता सी-२ झोन मधे कमर्शीयल ४० टक्के आणि उर्वरीत ६० टक्के असे आहे. त्यातून ३० टक्के रेसिडेन्शिअल आणि त्यानंतर छोटे छोटे शॉप, ऑफिसेस द्यायचे असे शासनाने पाठविलेले आहे.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, मार्चपर्यंत कमर्शिअल प्लॉटच्या ठिकाणी रेसिडेन्शिअल परमिशन दिली जात होती. मार्च महिन्यामध्ये असा कायदा आलेला आहे. पुर्वी आपण देत होतो हे कशाच्या अनुषंगाने आलेले आहे. आपण मागणी केलेली होती का.

मा.महापौर :- काची साहेब कमर्शिअल प्लॉटचे ते विचारतात.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, नवीन नवीन नियम काढत असतात, याची कुठलीही माहिती सभागृहाला दिली जात नाही. नागरीकांवर, जागामालकांवर अन्याय होतो तरी आपण प्रशासनाला आदेश द्यावेत. अशाप्रकारचे बदल होत असतात त्याची सभागृहाला माहिती मिळावी. त्यामुळे गैरसमज होतात आणि वेगवेगळया प्रकारच्या बातम्या पेपरला येतात तरी अशाप्रकारचे चेंजेस सभागृहापुढे आले पाहिजेत.

मा.महापौर :- शासनाकडून विषय आलेला होता, सभागृहाने मान्यता दिल्यानंतर गॅझेट आले आहे.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आता जो विषय आपल्यापुढे आला त्यामध्ये एक टिडीआर जसा पुर्वी दिला जात होता तसा द्यावा. तसा विषय सभागृहामध्ये आणावा आणि सभागृहाने मान्य करावा.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, पुर्वीचे डीसीआर नियमाप्रमाणे १ (एक) टीडीआर सर्वाना अनुज्ञेय ठेवणेसाठी विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.विठ्ठल काटे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :- पुर्वीचे डीसीआर नियमाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी सदरचा विषय दप्तरी दाखल करावा. १९९५ साली प्रचलीत जे नियम होते त्या नियमाप्रमाणे सर्वाना एक टिडीआर देणेत यावा आयुक्तांचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत यावा तुंम्ही त्याची अंमलबजावणी करायची आहे. १९९५ प्रमाणे डीपी लागू आहे त्याप्रमाणे कार्यवाही करायची आहे.

मा.सिमाताई सावळे :- मा.महापौर साहेब, आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ९७६ विषय क्रमांक :- ६

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि. नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९४१ दि.२३.७.२०१० अन्वये.

पुर्वीचे डीसीआर नियमाप्रमाणे १ (एक) टीडीआर सर्वाना अनुज्ञेय ठेवणेसाठी विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-६६ प्रतिकूल-१

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ७

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अति/२/कावि/२५३/०९ दि.२०/७/२००९

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२४ दि.२१.८.२००९ अन्वये.

विषय :- अनाधिकृत बांधकाम केल्याबद्यल नगरसदस्य श्री.सुरदास गायकवाड यांचेवर मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयास संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत.

ॲड.पद्मिनीराजे मोहिते यांनी नगरसदस्य श्री.सुरदास गायकवाड यांची पत्नीने फुगेवाडी येथे अनाधिकृत बांधकाम केले असल्याने श्री.सुरदास गायकवाड यांचेवर कारवाई करणेकामी म.न.पा.कडे अर्ज केलेला आहे.

या अर्जास अनुसरुन श्री.सुरदास गायकवाड यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्याचा या संदर्भात खुलासा मागविणेत आला होता. तथापि अद्यापही त्यानी खुलासा सादर केला नाही. दरम्यान श्री.सुरदास गायकवाड यांच्या पत्नी सौ.संध्या सुरदास गायकवाड यांना अनाधिकृत बांधकाम काढून घेणेबाबत नियमानुसार नोटीस दिली होती. तदनंतर मे.हायकोर्ट यांचे आदेशावरुन सदरचे बांधकाम पाडण्यात आलेले आहे. यावरुन श्री.सुरदास गायकवाड यांच्या पत्नी सौ.संध्या गायकवाड यांनी फुगेवाडी येथे अनाधिकृत बांधकाम केले होते. हे सिध्द झालेले आहे. तथापि सद्यस्थितीत सदर ठिकाणचे अनाधिकृत बांधकाम म.न.पा. मार्फत पाडण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत नगरसदस्य श्री.सुरदास गायकवाड हे नगरसदस्य म्हणून अपात्र होतील किंवा कसे याचा निर्णय न्यायालयाने देणे योग्य राहील. व त्यासाठी न्यायालयात संदर्भ करणे गरजेचे आहे. यापुर्वी अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्याबाबत मुंबई प्रांतिक मनपा. अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयास संदर्भ करण्याचे विषयपत्र मा.महापालिका सभेपुढे दि. १७/३/२००८ रोजी ठेवणेत आले. मात्र महापालिका या प्रकरणी सभेपुढे वेळोवेळी विषय ठेवूनही निर्णय होऊ शकला नाही. दि. ३/६/०९ च्या मा.महापालिका सभेमध्ये प्रस्तूत विषय एक वर्ष कालावधीकरीता तहकुब ठेवण्याचा निर्णय झाला आहे. तथापि या पार्श्र्वभुमीवर उक्त अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे न्यायधिशाकडून निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक झालेले आहे. तथापि मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १२ मधील तरतुदीप्रमाणे असा संदर्भ न्यायालयाकडे सादर करण्यासाठी सभागृहाने आयुक्तांना निर्देश देणे/ विनंती करणे आवश्यक आहे. यावरुन सदरील

विषयपत्र मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत यावे असा प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, हा विषय गांभीर्याने घ्यावा. हा विषय क्र.७ प्रशासनाने चुकिच्या पध्दतीने आणलेला आहे. हायकोर्टाचा स्टे आहे का, हायकोर्टाचा आदेश महापालिकेला आलेला आहे का, हे सांगावे. मी रोज महापालिकेच्या विरोधात पत्र देईल ते अजेंडयावर टाकणार आहात का. जर हायकोर्टाचा महापालिकेला आदेश असेलतर त्यांचा सन्मान आम्ही करणार आहोत परंतु हायकोर्टाचा आदेश कुठेही नाही, असेलतर तसे आयुक्तांनी सांगावे, हायकोर्टाचा आदेश वाचून दाखवावा. प्रशासनाने जानुनबुजून नगरसेवकाचा अपमान करण्यासाठी हा विषय आणलेला आहे त्याचा आम्ही निषेध करतो. आयुक्तांनी सांगावे हायकोर्टाचा आदेश आहे का, असेलतर आम्हांला दाखवावा. हायकोर्टाचे पत्र नगरसेवकांबद्यल आलेले आहे का हे सांगावे. लिगल ॲडव्हायझरला बोलवावे.

मा.महापौर :- लिगल ॲडव्हायझर कोर्टामध्ये गेलेले आहेत.

मा.अमर मुलचंदानी :- मा. महापौर साहेब, देशमुख साहेबांनी विषय आणलेला असावा अशी माझी माहिती आहे. विषय कोणी आणला ते सांगावे. हा विषय चुकिचा आलेला आहे, हायकोर्टाचे आदेश नाहीत. नगरसेवकाचा डिसक्वॉलीफाय होण्याचा प्रश्नच येत नाही.

मा.महापौर :- कायदासल्लागार सभागृहामध्ये नाहीत अमर मुलचंदानी यांच्या म्हणण्यात तथ्य दिसते. प्रशासन अधिकारी यांना सुध्दा याच्या बद्यल माहिती नाही. लिगल ॲडव्हायझर याठिकाणी नाहीत प्रशासनाची चुक आहे. संबंधीत नगरसेवकांचे घर पाडलेले आहे पुन्हा कार्यवाही करण्याचे कारण नाही त्यामुळे हा विषय प्रशासनाने माघारी घ्यायला पाहिजे होता त्यांना टेक्निकली माघारी घेता येत नाही तुम्ही सूचना करावी.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, एका सभासदाविषयी, नगरसेवकाबद्यल विषयपत्रिकेवर विषय कसा काय आला आणि कोणी आणला, कोणाच्या प्रेशरने आणला. चुकिचा विषय येतो. कोणीतरी पत्र लिहिले आणि विषयपत्रिकेवर विषय येतो हे कोणी केले, ज्या अधिका-यांनी विषय आणला त्यांना सस्पेन्ड करावे.

हा विषय एका नगरसेवकाचा अपमान करण्यासाठी आणलेला आहे किंवा हायकोर्टाचा आदेश दाखवावा आम्ही मान्य करु परंतु हे चुकिचे असेलतर त्यांना सस्पेन्ड केल्याशिवाय आम्ही थांबणार नाहीत.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. हा विषय आला कसा. वि.क्र.७ एका नगरसेवकांबद्यल आलेला आहे. हायकोर्टाचा

महापालिकेला आदेश आलेला असेलतर जरुर दाखवावा, जर हायकोर्टाचा आदेश आलेला नसेलतर एक ॲडव्होकेटचे पत्र आलेतर त्याप्रमाणे विषयपत्रिकेवर विषय येतो मग मी सुध्दा रोज पत्र देतो ते विषयपत्रिकेवर आणावे. हायकोर्टाचा आदेश आलेला असेलतर दाखवावा.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, ८ नंबरच्या विषयामध्ये संभाजी बारणे यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागीतलेली आहे. जेव्हा सैक्शन-१० एक डी खाली कुठलाही नगरसेवक डिसक्वॉलीफाय होत असेलतर त्यामध्ये आयुक्तांना पॉवर नाही त्यांनी जीबी कडे रेफर करायला पाहिजे. २५ नगरसेवकांचे पाठविले होते त्याच्यानंतर हे डॉकेट वेगळे केलेले होते. सैक्शन १० डी खाली डिसक्वॉलीफाय होत असेलतर त्यासाठी जीबीची परवानगी घेवून कोर्टाकडे रेफर करण्यासाठी हा विषय आहे. सैक्शन-१२ मध्ये प्रोव्हीजन आहे जीबीने निर्णय घ्यायचा आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, विषयामध्ये लिहीले आहे ॲड.पद्मिनीराजे मोहिते यांनी नगरसदस्य श्री.सुरदास गायकवाड यांच्या पत्नीने फुगेवाडी येथे अनाधिकृत बांधकाम केले असल्याने श्री.सुरदास गायकवाड यांचेवर कारवाई करणेकामी म.न.पा.कडे अर्ज केलेला आहे. डिसक्वॉलीफाय कुठल्या अधारे
सुचविणार आहात. चुकिचे कोणी लिहिले असेलतर ते जीबी मध्ये विषयपत्रिकेवर आलेले आहे उदया पेपरला येईल. एखादया वकिलांनी अर्ज दिलातर आपण कार्यवाही करणार का. प्रत्येक नगरसेवकांला पत्र आलेले आहे म्हणून एका नगरसेवकांवर कार्यवाही करणार का. एखादया माणसाने पत्र पाठविले एखादया नगरसवेकांच्या विरोधाततर जीबी मध्ये ते आणणार का.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, ॲड.मोहिते यांनी हा विषय आमच्याकडे रेफर केला असल्यामुळे त्याची खात्री करुन हा विषय जीबी कडे पाठविला आहे, अभ्यास करुन पाठविलेला आहे. संभाजी बारणे यांनी तक्रार केलेली होती त्यांचा सुध्दा विषय याठिकाणी पाठविलेला आहे. इललीगल कन्स्ट्रक्शन झाले असल्यामुळे सेक्शन १० प्रमाणे पुढची कार्यवाही काय करता येईल हे ॲक्टमध्ये बंधनकारक आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, ॲड.मोहिते यांनी कळविल्याप्रमाणे केलेले आहे का.

मा.महापौर :- सेक्शन १० प्रमाणे असे म्हणतात.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार दि. २०/८/२०११ चे सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, प्रशासनाने हे माघारी घेतले पाहिजे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, हा विषय सन्मा.नगरसेवक सुरदास गायकवाड यांच्या संदर्भातील आहे. फेब्रू.२००७ ला महापालिकेच्या सार्वत्रिक

निवडणूका झाल्यानंतर तत्कालीन आयुक्त दिलीप बंड यांनी गुरुबक्ष पेहलानी हे सलग तीन महिने महापालिका सभेला गैरहजर राहिल्यामुळे मुं.प्रां.मनपा कलम ११ अन्वये त्यांच्यावर कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला त्यावेळेला आपण महापौर नव्हता. आपण कलम १२ चा संदर्भ दिला, काही उच्च न्यायालयाचे निवाडे दाखविले. कलम १२ प्रमाणे गुरुबक्ष पेहलानी यांचे बरोबर आणखी काही सदस्यांचा विषय सभागृहामध्ये आला. त्यानंतर नगरसेवक चौधरी यांच्या संदर्भात ॲण्टीकरप्शनचा ट्रॅप झाला, त्यांचा सुध्दा विषय याठिकाणी आला. त्यानंतर दुसरे सहकारी उत्तम हिरवे यांच्या संदर्भात सुध्दा याच कलमाचा आधार घेवून विषय आला. आता जो विषय आलेला आहे सात नंबरचा तो देखील सभागृहामध्ये कलम १२ चा आधार घेवून आलेला आहे. कलम १२ प्रमाणे सभागृहाने मंजूरी दिल्यानंतर हा विषय न्यायालयामध्ये जाणार आहे. त्यांची चुक नसेलतर ते सहीसलामत सुटणार आहेत. जे दोषी आहेत, चुकिचे काम केलेले आहे त्यांच्यावर कार्यवाही होणार आहे. त्यावेळेला माझी विनंती होती की विषय मंजूर करावा परंतु आपण विषय मंजूर न करता सहा महिने, तीन महिने पुढे असे केलेले आहे. बोलण्यास संधी दिलेली नाही सात नंबरचा विषय आहे ते नगरसदस्य आमचे बधु आहेत त्यांच्या बद्यल आदर आहे परंतु आयुक्तांच्या संबंधीत त्यांच्या अधिपत्याखाली असलेले अधिकारी चुकतात, त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी असे आपण म्हणतो त्यांच्यावर प्रायव्हेट केस दाखल करतो, आयुक्तांकडे मागणी करतो. आम्ही १०५ नगरसेवक विश्वस्त म्हणून या सभागृहातले काम करत असताना आम्हांला, सभागृहाला मर्यादा, नियम घालून दिलेले आहेत त्याचे पालन करणे आमचे कर्तव्य आहे. सदस्यांच्या संदर्भात प्रस्ताव आलेले असतील त्यासंदर्भात मग तो विषय भाई सोनवणेंचा असेल, चौधरीचा असेल, सुरदास गायकवाड यांचा असेल ज्यांचे ज्यांचे विषय असतील ते तात्काळ मंजूर केले पाहिजेत तीच खऱ्या अर्थाने आपली नैतीक जबाबदारी सर्वांची आहे हा विषय कलम १२ अन्वये आणलेला आहे. बीपीएमसी ॲक्ट कलम १० (१) ड प्रमाणे आयुक्तांना तशाप्रकारचे कार्यवाही करण्याचे संकेत आहेत त्याप्रमाणे हा विषय आहे. कलम १३ प्रमाणे एखादया नगरसेवकांनी चुकिचे काम केले असेलतर त्यांचे नगरसेवकपद रद्य करायचे असेलतर कलम १३ प्रमाणे विषय ठेवला पाहिजे त्यास पालिकेच्या ३/४ सदस्यांनी मान्यता दिली पाहिजे असे कायद्यात आहे.

मा.महापौर :- डिसक्वॉलीफिकेशन म्हणतात हे कलम १२ प्रमाणे आहे. चौधरी, हिरवे होते ते कलम १३ प्रमाणे आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, मुद्या एकच आहे. या प्रकरणाच्या संदर्भात उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात निर्णय झालेला आहे त्याप्रमाणे महापालिकेनी दापोडी परिसरात कार्यवाही केलेली आहे त्याप्रमाणे संबंधीत नगरसेवकांचे थेट हितसंबंध आहेत त्याप्रमाणे कायदेशिर कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर :- आयुक्तांमार्फत विषय ठेवलेला आहे, सभागृहाने काय निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, अमर मुलचंदानी ॲडव्होकेट आहेत परंतु आज त्यांनी मित्राच्या प्रेमापोटी असेल याठिकाणी स्टेटमेंट केलेले आहे त्यांच्या मताशी मी सहमत नाही. त्यांनी सांगीतले ज्या अधिका-यांनी हा विषय आणला त्यांना सस्पेन्ड करावे. हा विषय आयुक्तांनी आणला आहे. आयुक्तांचे सुध्दा शिक्षण झालेले आहे त्यामुळे ते आयुक्त झालेले आहेत. आज १०५ नगरसेवकांना ॲड.मोहिते यांचे पत्र घरी आलेले आहे. काहींनी चुकिचे काम करायचे आणि त्याला बाकीच्यांनी उत्तर द्यायचे. कलम १२ अंतर्गत विषय ठेवला आहे. आयुक्तांनी सांगीतले १०(१) ड खाली कार्यवाही होणे गरजेचे आहे. आपण चुकिचे केले नसेलतर डिसक्वॉलीफाय होण्याचे कारण नाही. याठिकाणी नोटिस आलेली आहे, सुप्रिम कोर्टाने आदेश देवून ते बांधकाम इललीगल असल्याचे निदर्शनास आणुन दिल्यानंतर बांधकाम तोडलेले आहे. ॲड.मोहिते यांच्या पत्रामधे असे म्हणले आहे की, तुम्ही नगरसेवक हा विषय वारंवार तहकूब ठेवता त्यामुळे तुम्ही प्रतिवादी होऊ शकता. एक वर्ष विषय तहकूब ठेवण्याची कुठली पध्दत आहे. कार्यवाही व्हायला पाहिजे. विषय पास केल्यानंतर लगेच नगरसेवक पद जात नाही. तुम्ही चुकिचे काम करता आम्हांला बरोबर का घेता, आम्हांला ॲडव्होकेटचे पत्र येते. आम्ही कोणावर दावा करायचा. अशा पध्दतीचे चुकिचे काम करु नये. सेक्शन १२ म्हणलेले आहे इललीगल कन्स्ट्रक्शन प्रूव्ह झालेले आहे, कार्यवाही काहीही होईल आम्हांला घेणे देणे नाही. येथे १० (१) ड चा उल्लेख केलेला नाही. आपण तोंडी संगता की १० (१) ड खाली कार्यवाही व्हायला पाहिजे. आजच्या वर्तमानपत्रामध्ये बातमी आहे की आपण सर्व भाऊ भाऊ आणि आपण सर्व मिळून खाऊ. तरी याला आम्ही पाठिंबा देणार नाही. उदया वाद झालातर आपण सुध्दा प्रतिवादी होऊ शकता. २७ जे नगरसेवक आहेत त्यांना सुध्दा ही नोटिस लागू होऊ शकते. दोन्ही सेक्शन-१२ खाली ठेवलेले आहे. आम्हांला पत्र आलेले आहे नोटिस आलेली आहे, विषय तहकूब ठेवायचा असेलतर मतदान घ्यावे विषय तहकुब ठेवण्याला आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

मा.विजया जाधव, मा.सुलभा उबाळे, मा.सिमा सावळे, मा.मारुती भापकर, मा.भिमा बोबडे, मा.रघुनाथ वाघ,मा.प्रकाश बाबर, मा.बाळासाहेब भुंबे :- मा.महापौर साहेब, मतदान घ्यावे, विषय तहकुब ठेवण्याला आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-९७७ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अति/२/कावि/२५३/०९ दि.२०/७/२००९
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२४ दि.२१.८.२००९ अन्वये.

विषय :- अनाधिकृत बांधकाम केल्याबद्यल नगरसदस्य श्री.सुरदास गायकवाड यांचेवर मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयास संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार दि. २०/८/२०११ चे सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६६ प्रतिकूल-८

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८८० दि.२०/०५/२०१० अन्वये

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

श्री.संभाजी बारणे यांनी माहितीच्या अधिकारात करसंकलन विभागाकडून मिळविलेल्या माहितीप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेचे २५ नगरसदस्य/नगरसदस्या अनाधिकृत बांधकामाशी निगडीत असुन अशा नगरसदस्यावर कारवाई करण्यासाठीची विनंती महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली होती. शासनाने मनपा आयुक्ताकडे हे अर्ज चौकशीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

या अर्जाच्या चौकशीकामी सर्व नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा त्या संदर्भात खुलासा मागविणेत आला होता. त्यात काही नगरसदस्याचा खुलासा समाधान कारक असुन काही नगरसेवकांनी मात्र अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत./ होती. असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. अनाधिकृत बांधकामे

गुंठेवारी कायद्यानुसार नियमानुकुल झालेली असली तरी त्यामुळे अशा नगरसेवकांवर अपात्रता सिध्द होते वा नाही ही बाब न्यायालयाकडे संदर्भ करुनच खात्री करणे शक्य आहे.

तसेच काही नगरसेवकांनी आपले खुलाशात सदरची मालमत्ता / बांधकामे आपले नसुन आपले वडिल / आई / इतर नातेवाईक यांचे आहेत असे आपल्या खुलाशात नमुद केलेले आहे व त्याप्रमाणे करसंकलन विभागाकडे दुरुस्त नोंदीचे कागदपत्र सादर केलेले आहेत. तथापि संबंधित नगरसेवकांनी निवडणूक नामनिर्देशन पत्र भरतेवेळी केलेले मालमत्ता विषयक प्रतिज्ञापत्र पाहता सदरची मालमत्ता त्यांनी त्यांचे नावे असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे. अशा प्रसंगी संबंधित नगरसेवक अपात्र होईल वा कसे याचा न्यायालयांनी निर्णय देणे योग्य राहील व त्यासाठी न्यायालयाकडे संदर्भ करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे नगरसदस्यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाविषयी वाद उत्पन्न झाला असल्याने त्याविषयी न्यायाधिशांकडून निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक झालेले आहे. तथापि कलम १२ तील तरतुदीप्रमाणे असा संदर्भ न्यायालयाकडे करण्यासाठी सभागृहाने आयुक्तांना निर्देश देणे/विनंती करणे आवश्यक आहे. यास्तव सदरील विषयपत्र दि.१७/०३/२००८ रोजी मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत आले होते. तथापि महापालिका सभा ठराव क्रमांक ६५३ दि.०३/०६/२००९ अन्वये सदर विषयाबाबतचा विचार दि.१९/०६/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा असा निर्णय झाला.

मा.उपसचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२०/०१/२०१० चे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामे असणाऱ्या नगरसेवकांचे पद रद्द करणेबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४४८ चा विचार करता कलम ४४८ नुसार याप्रकरणी हे आदेश प्राप्त झालेपासुन ३० दिवसात सदरचा विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा असा प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडून आला आहे. मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार दि. २०/८/२०११ चे सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब,सूचनेस अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर, मा.विजया जाधव, मा.सुलभा उबाळे, मा.सिमा सावळे, मा.भिमा बोबडे,मा.रघुनाथ वाघ, मा.प्रकाश बाबर, मा.बाळासाहेब भुंबे :- मा.महापौर साहेब, आमचा विरोध नोदवावा.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ९७८ विषय क्रमांक :- ८

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८८० दि.२०/०५/२०१० अन्वये

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

विषय क्रमांक ८ चा विचार दि. २०/८/२०११ चे सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६६ प्रतिकूल-८

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-९७९ विषय क्रमांक :- ९

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) दि.१८/६/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि.६/७/२०१० चे विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-९८० विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.महिला व बालकल्याण समिती

अ) दि.९/६/२०१० व १४/६/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि. ६/७/२०१० चे विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-९८१ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

अ) दि. २/ ६/२०१०, ९/६/२०१० व १६/६/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि. १६/६/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

क) दि. ६/७/२०१० चे विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ड) दि. २१/७/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमाक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-९८२ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिती

अ) दि.२/६/२०१०,३/६/२०१० व १६/६/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि. ६/७/२०१० चे विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

क) दि. २१/७/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १३
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.१३१ दि. १६.११.२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९४९ दि.२३.७.२०१० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्यीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. ७७ ते गट नं. १४४ मध्ये १८ मिटर रुंदीचा अंतर्गत रस्ता विकास आराखडयामध्ये दर्शविणेत आलेला असून सदर परिसरात मूळ मालकांनी वाटपानुसार पुर्व पश्चिम विविध अंतर्गत रस्ते टाकले आहेत. हा अंतर्गत रस्ता गट नं. ७७ ते गट नं. १४४

पर्यंतच दाखविलेला असल्याने सदर रस्त्याची गरज वाटत नाही. तसेच या भागातील रस्ताबाधीत शेतकरी हे अल्पभूधारक असलेने गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतचा नियोजीत १८ मीटर रस्ता विकास आराखडयातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो.

पिंपरी वाघेरे येथील स.नं. ३०९ पैकी आ.क्र.१७२ म्हाडामधील उत्तरेकडील सुमारे ३.५ एकर क्षेत्र शाळेसाठी आरक्षित करण्यासाठी मुंबई प्रांतिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास व त्याप्रमाणे शासनाची मान्यता घेण्यास तसेच भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी. गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतचा नियोजीत १८ मीटर रस्ता विकास आराखडयातून रद्द करण्यास मान्यता देणेत यावी. तळवडे येथील गट क्रमांक ११३,११४,११५ मधील उद्यान व माध्यमीक शाळा यासाठी आरक्षीत असून ते रद्द करण्यास मान्यता देणेत यावी. तळवडे येथील गट क्रमांक ७१ मध्ये रस्ता अस्तीत्वात असलेने गट क्रमांक ७२ मधील रस्त्याचे आरक्षण रद्द करण्यास मान्यता देणेत यावी.

मौजे चिखली तळवडे शिवेवरील रस्ता गट नं. ६७ ते २५ असलेला रस्ता २४ मीटर करण्याचे आरक्षण असून ते फक्त तळवडे बाजूस टाकणेत आले असून ते सध्या अस्तीत्वात असलेल्या रस्त्याच्या दुस-या बाजूने म्हणजेच चिखलीच्या बाजूनेही समांतर टाकण्यास मान्यता देणेत यावी.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ९८३ विषय क्रमांक :- १३

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.१३१ दि. १६.११.२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९४९ दि.२३.७.२०१० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्यीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. ७७ ते गट नं. १४४ मध्ये १८ मिटर रुंदीचा अंतर्गत रस्ता विकास आराखडयामध्ये दर्शविणेत आलेला असून सदर परिसरात मूळ मालकांनी वाटपानुसार पुर्व पश्चिम विविध अंतर्गत रस्ते टाकले आहेत. हा अंतर्गत रस्ता गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतच दाखविलेला असल्याने सदर रस्त्याची गरज वाटत नाही. तसेच या भागातील रस्ताबाधीत शेतकरी हे अल्पभूधारक असलेने गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतचा नियोजीत १८ मीटर रस्ता विकास आराखडयातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी वाघेरे येथील स.नं. ३०९ पैकी आ.क्र.१७२ म्हाडामधील उत्तरेकडील सुमारे ३.५ एकर क्षेत्र शाळेसाठी आरक्षित करण्यासाठी मुंबई प्रांतिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास व त्याप्रमाणे शासनाची मान्यता घेण्यास तसेच भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे. गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतचा नियोजीत १८ मीटर रस्ता विकास आराखडयातून रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे. तळवडे येथील गट क्रमांक ११३,११४,११५ मधील उद्यान व माध्यमीक शाळा यासाठी आरक्षीत असून ते रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे. तळवडे येथील गट क्रमांक ७१ मध्ये रस्ता अस्तीत्वात असलेने गट क्रमांक ७२ मधील रस्त्याचे आरक्षण रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मौजे चिखली तळवडे शिवेवरील रस्ता गट नं. ६७ ते २५ असलेला रस्ता २४ मीटर करण्याचे आरक्षण असून ते फक्त तळवडे बाजूस टाकणेत आले असून ते सध्या अस्तीत्वात असलेल्या रस्त्याच्या दुस-या बाजूने म्हणजेच चिखलीच्या बाजूनेही समांतर टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ९८४ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.गोपाळ कुटे यांचा प्रस्ताव
२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.१६९ दि. ०८.०१.२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९६५ दि.२३.७.२०१० अन्वये.

आकुर्डी येथिल विठ्ठलवाडीतील विठ्ठल मंदिरासमोरील चौकात एकत्रीत येणा-या रस्त्यांचे island पासून रस्त्याचे कडेपर्यंत (कर्व्हेचर) चे अंतर १२.०० मीटर करणेस तसेच विठ्ठल मंदिराचे उत्तरेकडील रस्ता १२ मीटर ऐवजी ७.५ मीटर करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ९८५ विषय क्रमांक :- १५

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.गोपाळ कुटे यांचा प्रस्ताव

२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.१७० दि. ०८.०१.२०१०

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९६६ दि.२३.७.२०१० अन्वये.

प्रभाग क्रमांक ५२ व ५४ मधील १) आकुर्डी दत्तवाडी विठ्ठलवाडी रस्ता २) आकुर्डी विठ्ठल रुखमीनी मंदिर रस्ता ३) आकुर्डी दत्तवाडी विठ्ठलवाडी मुख्य रस्ता या रस्त्याची गोलाई कमी करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १६

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) क्रमांक: बप्र/स्था/काअ/९/कावि/३६/१०, दि.९/०६/२०१०

२) मा.ब प्रभाग समितीकडील ठ.क्र.१८९ दि. ९/०६/२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश मंजूर विकास योजनेतील मौजे पुनावळे येथील आ.क्र. ४/७४ए, मैलाशुध्दीकरण प्रकल्प या आरक्षणाखालील जागेचा विकास JNNURM अंतर्गत करण्यासाठी सदर जागा महापालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. तसेच मौजे पुनावळे येथील

आ.क्र.४/६६EWS (आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे) या प्रयोजनासाठीची जागाही महापालिकेच्या ताब्यात घेणे गरजेचे आहे. सदर आरक्षणाखालील जागा ताब्यात घेताना सदर जागांचा १२.०० मी.रुंद पोचरस्त्यांखालील जागाही ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर आरक्षित क्षेत्रांच्या भूसंपादनास मान्यता देणेत येत आहे.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

मंजूर विकास योजनेमध्ये मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ७२ ते ८४ मधून (आ.क्र. ३५२ ते आ.क्र. ३५७ अ पर्यंत) दक्षिण-उत्तर १२.०० मी.रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्याच्या क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन अधिनियम १९८४ नुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास मान्यता देणेत यावी. मंजूर विकास योजनेमध्ये मौजे सांगवी येथील स.नं. १३ ते २६ मधून (आ.क्र.३१६ लगतचा) पूर्व-पश्चिम १२.०० मी.रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्याच्या क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन अधिनियम १९८४ नुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्दीच्या भागशः मंजुर विकास योजनेतील मौजे मामुर्डी व किवळे येथे १८.०० मी व १२ मी. रुंदिचे रस्ते प्रस्तावित आहेत. मौजे मामुर्डीच्या पश्चिमेस गहुंजे हद्दीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडीयम बांधणेत येत असून स्टेडियम करिता सदरचे पोच रस्ते विकसित करणे आवश्यक आहेत. त्यासाठी मामुर्डी व गहुंजे हद्दीवरील १८.०० मी. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या उत्तरेकडील १२.०० मी. चा सर्व्हीस रोड, तसेच स.नं. ३,४,८,१० व ११ मधुन जाणारा दक्षिण-उत्तर १८.०० मी.रस्ता, स.नं. ११ ते ३२ मधील पुर्व-पश्चिम १८ मी रस्ता तसेच मामुर्डी किवळे हदद्दीवरील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाने गावठाण पर्यंतच्या १८.०० मी. रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे यासाठी या रस्त्यांच्या आरक्षीत जमिनींचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भुसंपादन कायदा १८९४ अन्वये भुसंपादन करणेकामी व मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीस पाठविणेकामी मान्यता देणेत यावी. किवळे,मामुर्डी क्षेत्राचा विकास आराखडा बनवण्यात आला आहे. या विकास आराखडयानुसार किवळे गावातुन येणारा १८ मीटर रस्ता आणि मामुर्डी गावातुन येणारा १८ मीटर रस्ता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील एका बोगदयाने जोडण्यात आले आहेत. हा बोगदा मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाखालून जातो. या बोगदयाची रुंदी ७ मीटर आहे. किवळे,मामुर्डी आणि गहूंजे गावानजीक क्षेत्रातील विकास कामासाठी या रस्त्याचा उपयोग होणार आहे. गहूंजे येथे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे मैदान होत असल्यामुळे भविष्यात होणारी वाहनाची कोंडी टाळण्यासाठी पुढील विकासाच्या

दृष्टीने बोगदयाची रुंदी अजून ७ मीटर वाढवणे आवश्यक आहे. यासाठी box pushing Method चा वापर योग्य ठरेल. या विषयी लवकरात लवकर कारवाई करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील परंतु, सन १९९७ साली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली हस्तांतरित करणेत आलेल्या मौजे थेरगांव येथिल थेरगांव गावठाण ते मोरया मंगल कार्यालयाकडे जाणारा स.नं. २८,२९,३१,३२,३३ व ३६,३७ पै.या मिळकतीमधील प्रस्तावित २४.०० मी. रस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना व विकास अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) सह भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.सतीष दरेकर व मा.श्रीरंग बारणे यांची, मा.मनोज खानोलकर व मा.विनायक रणसुभे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ९८६ विषय क्रमांक :- १६

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) क्रमांक: बप्र/स्था/काअ/९/कावि/३६/१०, दि.९/०६/२०१०

२) मा.ब प्रभाग समितीकडील ठ.क्र.१८९ दि. ९/०६/२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश मंजूर विकास योजनेतील मौजे पुनावळे येथील आ.क्र. ४/७४ए, मैलाशुध्दीकरण प्रकल्प या आरक्षणाखालील जागेचा विकास JNNURM अंतर्गत करण्यासाठी सदर जागा महापालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. तसेच मौजे पुनावळे येथील आ.क्र.४/६६EWS (आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे) या प्रयोजनासाठीची जागाही महापालिकेच्या ताब्यात घेणे गरजेचे आहे. सदर आरक्षणाखालील जागा ताब्यात घेताना सदर जागांचा १२.०० मी.रुंद पोचरस्त्यांखालील जागाही ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर आरक्षित क्षेत्रांच्या भूसंपादनास मान्यता देणेत येत आहे. मंजूर विकास योजनेमध्ये मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ७२ ते ८४ मधून (आ.क्र. ३५२ ते आ.क्र. ३५७ अ पर्यंत) दक्षिण-उत्तर १२.०० मी.रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे.

सदर रस्त्याच्या क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन अधिनियम १९८४ नुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. मंजूर विकास योजनेमध्ये मौजे सांगवी येथील स.नं. १३ ते २६ मधून (आ.क्र.३१६ लगतचा) पूर्व-

पश्चिम १२.०० मी.रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्याच्या क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन अधिनियम १९८४ नुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्दीच्या भागश: मंजुर विकास योजनेतील मौजे मामुर्डी व किवळे येथे १८.०० मी व १२ मी. रुंदिचे रस्ते प्रस्तावित आहेत. मौजे मामुर्डीच्या पश्चिमेस गहुंजे हद्दीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडीयम बांधणेत येत असून स्टेडियम करिता सदरचे पोच रस्ते विकसित करणे आवश्यक आहेत. त्यासाठी मामुर्डी व गहुंजे हद्दीवरील १८.०० मी. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या उत्तरेकडील १२.०० मी. चा सर्व्हीस रोड, तसेच स.नं. ३,४,८,१० व ११ मधुन जाणारा दक्षिण-उत्तर १८.०० मी.रस्ता, स.नं. ११ ते ३२ मधील पुर्व-पश्चिम १८ मी रस्ता तसेच मामुर्डी किवळे हदद्दीवरील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाने गावठाण पर्यंतच्या १८.०० मी. रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे यासाठी या रस्त्यांच्या आरक्षीत जमिनींचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भुसंपादन कायदा १८९४ अन्वये भुसंपादन करणेकामी व मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीस पाठविणेकामी मान्यता देणेत येत आहे. किवळे,मामुर्डी क्षेत्राचा विकास आराखडा बनवण्यात आला आहे. या विकास आराखडयानुसार किवळे गावातुन येणारा १८ मीटर रस्ता आणि मामुर्डी गावातुन येणारा १८ मीटर रस्ता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील एका बोगदयाने जोडण्यात आले आहेत. हा बोगदा मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाखालून जातो. या बोगदयाची रुंदी ७ मीटर आहे. किवळे,मामुर्डी आणि गहूंजे गावानजीक क्षेत्रातील विकास कामासाठी या रस्त्याचा उपयोग होणार आहे. गहूंजे येथे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे मैदान होत असल्यामुळे भविष्यात होणारी वाहनाची कोंडी टाळण्यासाठी पुढील विकासाच्या दृष्टीने बोगदयाची रुंदी अजून ७ मीटर वाढवणे आवश्यक आहे. यासाठी box pushing Method चा वापर योग्य ठरेल. या विषयी लवकरात लवकर कारवाई करण्यास मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील परंतु, सन १९९७ साली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली हस्तांतरित करणेत आलेल्या मौजे थेरगांव येथिल थेरगांव गावठाण ते मोरया मंगल कार्यालयाकडे जाणारा स.नं. २८,२९,३१,३२,३३ व ३६,३७ पै.या मिळकतीमधील प्रस्तावित २४.०० मी. रस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना व विकास अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) सह भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७४ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १७

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/२ब/
च-होली /३३/२०१० दि. ५/०५/२०१० चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१५४६ दि. ५/५/२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९७० दि.२३.७.२०१० अन्वये.

संदर्भ :- मौजे च-होली येथील स.नं. ३४४,३४५,३४६ मधील भागश: मंजूर विकास योजनेतील १८.० मी.रस्ता आखणीत फेरबदल करणेबाबत.....

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्यवाढीच्या भागश: मंजूर विकास योजनेनुसार मौजे च-होली येथील स.नं. ३५३/६ (जुना स.नं. ३८९) हया मिळकतीचा काही भाग आ.क्र. २/१०१ उद्यान या प्रयोजनाने बाधीत होत असून उर्वरीत भाग निवासी विभागात समाविष्ट आहे. तसेच विकास योजनेत अस्तित्वातील रस्ता हा स.नं. ३४४ (जुना ३८०),स.नं. ३४६ (जुना ३८२) स.नं.३४७ (जुना ३८३),स.नं.३४८ (जुना ३८४), स.नं.३४९ (जुना ३८५) मध्ये दर्शविण्यात आला असून सदर रस्त्यास १८.० मी रस्ता रुंदीकरण प्रस्तावित केले आहे.

तथापि प्रत्यक्ष जागेवर मोजणी नकाशा व प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता अस्तित्वातील रस्ता हा प्रत्यक्षात स.नं. ३५३ (जुना स.नं. ३८९) लगत स.नं. ३८३ (जुना ३८३), स.नं. ३४९ (जुना ३८५) मध्ये आहे, तथापि विकास योजनेतील रस्तारुंदी ही अस्तित्वातील रस्त्यास दर्शविलेली असल्याने सदर प्रत्यक्ष जागेवरील अस्तित्वातील रस्तारुंदीकरण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर प्रत्यक्ष जागेवरील रस्त्यास १८.० मी रस्ता आखणी करणे आवश्यक आहे. तसेच सदर आखणीत फेरबदल करताना सदर रस्त्या आखणी लगत असलेली आरक्षण क्र. २/१०१ उद्यान व आ.क्र. २/१०० सांस्कृतिक केंद्र व वाचनालय ही आरक्षणे देखील स्थलबदल करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :-  मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.
मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
अलिकडेच पिंपरी चिंचवड शहरातील B.R.T.झोन/कॉरीडॉर मधील विकास परवानगी विषयक नियमावली शासनाने मंजुर केलेली आहे. या नियमावलीतील काही अटी व शर्ती या अत्यंत जाचक असून प्रत्यक्ष जागेवर विकासास बाधक ठरत आहेत, असे दिसून येते. तरी B.R.T.झोन/कॉरीडॉर मधील विकासास चालना मिळण्यासाठी व B.R.T. धोरण प्रभाविपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे बदल करण्यात यावेत.
१) यापुर्वी शासनाने मंजुर केलेल्या धोरणानुसार प्रिमीयम आकारणी न करता हे धोरण रद्द करण्यात येऊन त्याऐवजी ज्याठिकाणी T.D.R वापरुन जादा बांधकाम करण्यात येणार आहे त्या जागेचे शासनाचे रेडीरेकनरनुसार येणा-या किंमतीचे २५% टक्के एवढी रक्कम अधिमुल्य/प्रिमियम म्हणुन आकारण्यात यावी.
२) यापुर्वी शासनाने B.R.T. साठी मंजुर केलेले डबल Parking चे धोरण रद्द करण्यात येऊन त्याऐवजी सिंगल पार्कींग क्षेत्र (प्रचलीत नियमाप्रमाणे) प्रस्तावित करण्यात यावे मात्र B.R.T. रस्त्याला लागून असलेल्या इमारतींसाठी किमान सामासिक अंतर ७.५० मी. ऐवजी ९.०० मी. एवढे ठेवुन त्यामध्ये उपलब्ध होणारे जादा क्षेत्र हे सार्वजनिक वहानतळासाठी मनपास विनामोबदला उपलब्ध करुन देण्यात यावे.

वरीलप्रमाणे बदल करण्यास योग्य ती कार्यवाही करुन त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.
३) तसेच दि. ०३/०३/१० पुर्वी ज्या बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहे अशा बांधकाम परवानग्यांना टी.डी.आर.नुसार जादा ०.४ चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर करण्यात यावा तथापी अशा प्रकरणी बी आर टी झोनचे नियमानुसार प्रिमीयम व जादा पार्कींग लागू होणार नाही.
४) यापुर्वी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.टिपीलस-१८०९/४/सी आर-१६५२/०९/युडी-१३ दि. ०३/०३/२०१० मध्ये नमुद केल्याप्रमाणे मा.महापालिका सभा ठराव क्र. ७९८ दि. १९/०१/२०१० मधील मंजूर करण्यात आलेल्या प्रिमीयम,पार्कींग,सेट बॅक च्या तरतुदी रद्द करण्यात येऊन वरीलप्रमाणे अनुक्रमांक १ ते ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व कार्यवाही (उदा.जाहीर नोटीस प्रसिध्द करणे, सुचना व हरकती मागविणे, सुनावणी देणे इत्यादी) पुर्ण करुन फेरबदल प्रस्ताव शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.
मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रंमांक :- ९८७ विषय क्रमांक :- १७

दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/२ब/
च-होली /३३/२०१० दि. ५/०५/२०१० चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१५४६ दि. ५/५/२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९७० दि.२३.७.२०१०
अन्वये.

संदर्भ :- मौजे च-होली येथील स.नं. ३४४,३४५,३४६ मधील
भागश: मंजूर विकास योजनेतील १८.० मी.रस्ता
आखणीत फेरबदल करणेबाबत.....

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्यवाढीच्या भागश: मंजूर विकास योजनेनुसार मौजे च-होली येथील स.नं. ३५३/६ (जुना स.नं. ३८९) हया मिळकतीचा काही भाग आ.क्र. २/१०१ उद्यान या प्रयोजनाने बाधीत होत असून उर्वरीत भाग निवासी विभागात समाविष्ट आहे. तसेच विकास योजनेत अस्तित्वातील रस्ता हा स.नं. ३४४ (जुना ३८०),स.नं. ३४६ (जुना ३८२) स.नं.३४७ (जुना ३८३),स.नं.३४८ (जुना ३८४), स.नं.३४९ (जुना ३८५) मध्ये दर्शविण्यात आला असून सदर रस्त्यास १८.० मी रस्ता रुंदीकरण प्रस्तावित केले आहे.

तथापि प्रत्यक्ष जागेवर मोजणी नकाशा व प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता अस्तित्वातील रस्ता हा प्रत्यक्षात स.नं. ३५३ (जुना स.नं. ३८९) लगत स.नं. ३८३ (जुना ३८३), स.नं. ३४९ (जुना ३८५) मध्ये आहे, तथापि विकास योजनेतील रस्तारुंदी ही अस्तित्वातील रस्त्यास दर्शविलेली असल्याने सदर प्रत्यक्ष जागेवरील अस्तित्वातील रस्तारुंदीकरण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर प्रत्यक्ष जागेवरील रस्त्यास १८.० मी रस्ता आखणी करणे आवश्यक आहे. तसेच सदर आखणीत फेरबदल करताना सदर रस्त्या आखणी लगत असलेली आरक्षण क्र. २/१०१ उद्यान व आ.क्र. २/१०० सांस्कृतिक केंद्र व वाचनालय ही आरक्षणे देखील स्थलबदल करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

अलिकडेच पिंपरी चिंचवड शहरातील B.R.T.झोन/कॉरीडॉर मधील विकास परवानगी विषयक नियमावली शासनाने मंजुर केलेली आहे. या नियमावलीतील काही अटी व शर्ती या अत्यंत जाचक असून प्रत्यक्ष जागेवर विकासास बाधक ठरत आहेत,

असे दिसून येते. तरी B.R.T.झोन/कॉरीडॉर मधील विकासास चालना मिळण्यासाठी व B.R.T. धोरण प्रभाविपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे बदल करण्यात यावेत.

१) यापुर्वी शासनाने मंजुर केलेल्या धोरणानुसार प्रिमीयम आकारणी न करता हे धोरण रद्द करण्यात येऊन त्याऐवजी ज्याठिकाणी T.D.R वापरुन जादा बांधकाम करण्यात येणार आहे त्या जागेचे शासनाचे रेडीरेकनरनुसार येणा-या किंमतीचे २५% टक्के एवढी रक्कम अधिमुल्य/प्रिमियम म्हणुन आकारण्यात यावी.

२) यापुर्वी शासनाने B.R.T. साठी मंजुर केलेले डबल Parking चे धोरण रद्द करण्यात येऊन त्याऐवजी सिंगल पार्कींग क्षेत्र (प्रचलीत नियमाप्रमाणे) प्रस्तावित करण्यात यावे मात्र B.R.T. रस्त्याला लागून असलेल्या इमारतींसाठी किमान सामासिक अंतर ७.५० मी. ऐवजी ९.०० मी. एवढे ठेवुन त्यामध्ये उपलब्ध होणारे जादा क्षेत्र हे सार्वजनिक वहानतळासाठी मनपास विनामोबदला उपलब्ध करुन देण्यात यावे.

वरीलप्रमाणे बदल करण्यास योग्य ती कार्यवाही करुन त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

३) तसेच दि. ०३/०३/१० पुर्वी ज्या बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहे अशा बांधकाम परवानग्यांना टी.डी.आर.नुसार जादा ०.४ चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर करण्यात यावा तथापी अशा प्रकरणी बी आर टी झोनचे नियमानुसार प्रिमीयम व जादा पार्कींग लागू होणार नाही.

४) यापुर्वी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.टिपीलस-१८०९/४/सी आर-१६५२/०९/युडी-१३ दि. ०३/०३/२०१० मध्ये नमुद केल्याप्रमाणे मा.महापालिका सभा ठराव क्र. ७९८ दि. १९/०१/२०१० मधील मंजूर करण्यात आलेल्या प्रिमीयम,पार्कींग,सेट बॅक च्या तरतुदी रद्द करण्यात येऊन वरीलप्रमाणे अनुक्रमांक १ ते ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व कार्यवाही (उदा.जाहीर नोटीस प्रसिध्द करणे, सुचना व हरकती मागविणे, सुनावणी देणे इत्यादी) पुर्ण करुन फेरबदल प्रस्ताव शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ९८८ विषय क्रमांक :- १८
दिनांक :- २०.८.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वृक्ष/
५/कावि/४७५/१० दि.१६/०८/२०१०

पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरातील वाढत्या कारखानदारीचा व त्यामुळे निर्माण होणा-या वायुप्रदुषणाचा तसेच पुणे मुंबई रस्ता,पुणे नाशिक रस्ता टेल्को रस्ता,औंध रस्ता यावरील रहदारीमुळे मोठया प्रमाणात निर्माण होणा-या ध्वनी व वायु प्रदुषणाच्या धोक्यास वेळीच आवर घालणेचे दृष्टीने पर्यावरणाबाबत मुलभूत सुधारणा करणे अत्यंत जरुरीचे आहे. शहराची लोकसंख्या १६ लाख आहे. शहराची वाढती हद्य वाढली लोकसंख्या याबरोबरच नागरी सुविधांचे प्रश्न वाढु लागले आहेत.

त्या अनुषंगाने शहराचे पर्यावरणाच्या दृष्टीने शहरामध्ये उद्याने/वृक्षलागवड याचा विचार करुन महापालिकेने २८० एकर क्षेत्रावर ३२ उद्याने विकसीत केलेली असुन २० लाखाच्यावर वृक्षारोपण केलेले आहे. वृक्षारोपण शास्त्रोक्त पध्दतीने होण्याच्या दृष्टीने मनपाने शहराचा नागरी वनीकरण बृहत आराखडा तयार केलेला असून त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी झालेली आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने शहरामध्ये ३३% भाग ग्रीनकव्हर मध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने व पर्यायाने पर्यावरणाचे संतुलन राखणेकामी वृक्षलागवडीच्या क्षेत्रामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. मनपा परिसरातील मोकळया जागा एम.आय.डी.सी. व प्राधिकरणाच्या मोकळया जागा गायराने याठिकाणी या पुर्वीच महापालिकेमार्फत वृक्षारोपण केलेले आहे सद्यस्थितीमध्ये मनपा हद्यीमध्ये वृक्षारोपणासाठी मोठया जागा उपलब्ध नाहीत. यावर उपाय म्हणून मनपा हद्यीलगतच्या व हद्यीतील सरकारी/खाजगी मोकळया जागावर वृक्षारोपण करणे आवश्यक आहे.

दिनांक ७.८.२०१० रोजी मा.दिलीप बंड-विभागीय आयुक्त, मा.चंद्रकांत दळवी जिल्हाधिकारी, मा.अशिष शर्मा-आयुक्त पिंपरी चिंचवड मनपा, भंडारा डोंगर दशमी उत्सव समिती यांच्या समवेत भंडारा डोंगर येथे समक्ष साईट पाहणी व मिटिंग झाली

सदर मिटींग मध्ये भंडारा डोंगर परिसरामध्ये चालु वर्षी ४०००० वृक्षारोपण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत करण्याचे ठरले.

त्यानुसार भंडारा डोंगर येथे चालु वर्षी ४०००० वृक्षारोपण करणे व त्याचे दोन वर्षे संगोपन करणेकामी सोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून त्यानुसार ४०००० वृक्षारोपण करणे व त्याचे दोन वर्षे पाणी देणेसह देखभाल/संरक्षण करणे याकामी र.रु. ९२,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी भंडारा डोंगर देहू येथे महापालिके मार्फत ४०००० वृक्षारोपण करणे व त्याचे दोन वर्षे पाणी देणेसह देखभाल/संरक्षण करणेस व त्याकामी येणा-या र.रु. ९२,००,०००/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी भंडारा डोंगर येथे वृक्षारोपण करण्यासाठी १ कोटी खर्चाचा विषय आहे तो विषय १ के खाली दाखल
झालेला आहे. १ कोटी रुपयाची झाडे देहूला लावणार आहेत. परंतु विषय मंजुर होण्याच्या अगोदर वर्तमानपत्रामध्ये त्या विषयाची निवीदा आलेली आहे आणि आता मान्यता घेता आहात निवीदा कशी काय काढली.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.महापौर :- सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(योगेश मंगलसेन बहल )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/ ९/कावि/ २५२ /१०
दिनांक :- १ / ९ /२०१०

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.